# मनपा निवडणुकीत भाजपा-राष्ट्रवादी युतीचा ऐतिहासिक विजय




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २६.०१.२०२६ | अंक नं. २३९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020







## महाविकास आघाडीचा धुव्वा, एमआयएमने उघडले खाते; बसपाचाही एका जागेवर विजय

नगर - अहिल्यानगर महापालिकेच्या निवडणुकीत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. सुजय विखे पा. व आ. संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पार्टी - राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) युतीने ऐतिहासिक विजय मिळवला आहे. या युतीला ६८ पैकी ५२ जागा मिळाल्या. या निवडणुकीत महविकास आघाडीचा धुव्वा उडाला. शिवसेना ठाकरे गटाला १ तर कॉंग्रेसला २ जागा मिळवता आल्या. राष्ट्रवादी शरद पवार गटाला एकही जागा मिळाली नाही. या निवडणुकीत एमआयएमने नगरमध्ये खाते उघडले असून, दोन जागांवर त्यांचा विजय झाला आहे. बसपालाही एक जागा मिळाली. शिवसेना शिंदे गटाने १० जागा मिळवल्या आहेत.



राज्यात सत्तेवर असलेल्या भाजप-राष्ट्रवादी अजित पवार गट-शिंदेसेना या महायुतीतील शिंदे सेनेने स्वबळावर निवडणूकलढवली. मात्र त्यांना १० जागाच मिळवता आल्या. राष्ट्रवादी (अजित पवार) २७ जागा मिळवत सर्वात मोठा पक्ष ठरला. तर त्या पाठोपाठ भाजपानेही २५ जागा मिळवल्या आहेत. दिग्गजांना पराभवाचा सामना करावा लागला आहे.

केडगावच्या प्रभाग १६ व १७ मधून ज्येष्ठ नेते भानुदास कोतकर यांच्या नेतृत्त्वाखाली अपक्षांच्या पॅनलने प्रचारात शेवटच्या काही दिवसात चांगलीच रंगत आणली होती. या ठिकाणी युती, शिंदे सेना व अपक्ष आघाडी अशी तिरंगी लढत झाली. या लढतीत अपक्ष आघाडीला पराभवाचा सामना करावा लागला. केडगावमधील सर्व जागा युतीने जिंकल्या आहेत.

(पुढील मजकूर पान २ वर, सविस्तर निकाल पान ७ वर)

### पक्षीय बलाबल

| | |
|---|---|
| राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) | २७ |
| भारतीय जनता पार्टी | २५ |
| एकनाथ शिंदे (शिवसेना) | १० |
| कॉंग्रेस | ०२ |
| एमआयएम | ०२ |
| उद्धव ठाकरे (शिवसेना) | ०१ |
| बहुजन समाज पार्टी | ०१ |



अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निकालानंतर भाजप, राष्ट्रवादी कॉंग्रेस महायुतीच्या कार्यकर्त्यांसमवेत आमदार संग्राम जगताप, व डॉ. सुजय विखे पाटील व विजयी नगरसेवक.












जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जनतेचा कौल मान्य; नव्याने पक्षबांधणी करणार : किरण काळे



नगर - खा. निलेश लंके, मविआ विधानसभा उमेदवार अभिषेक कळमकर यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडी मनपा निवडणूक लढली. २१ जागांवर आम्ही शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) म्हणून लढलो. पक्षाचे खाते प्रभाग तीनच्या एका जागेवरील विजयामुळे उघडले. नगरकरांनी दिलेला कौल आम्हाला मान्य आहे. पराभवाचे आम्ही आत्मचिंतन करू. पक्षाची पुनर्बांधणी करू. सभागृहात जरी विरोधी पक्ष म्हणून आम्हाला या निवडणुकीच्या माध्यमातून संधी मिळाली नसली तरी सभागृहा बाहेरून नगरकरांच्या प्रश्नांवर ठाकरे शिवसेना विरोधी पक्ष म्हणून आवाज उठवेल, असे प्रतिपादन ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केले आहे.

मनपा निवडणूक निकालानंतर ते बोलत होते. काळे म्हणाले, खा.लंके यांच्या माध्यमातून आम्ही लोकसभा जिंकली होती. विधानसभेला महाविकास आघाडी उमेदवाराचा पराभव झाला होता. मनपा निवडणुकीत चांगल्या जागा मिळतील अशी आम्हाला अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात तसे घडले नाही. ही वस्तुस्थिती आहे. ती नाकारता येणार नाही. संघर्ष शिवसेनेला नवीन नाही. शिवसैनिकांनी नाउमेद होऊ नये. लोकशाहीमध्ये हार - जीत सुरू असते. मात्र या पराभवाचे वस्तुनिष्ठ, सखोल आत्मचिंतन हे करावे लागेल. त्यातून समोर येणाऱ्या त्रुटींवर आम्ही निश्चितपणे काम करू. नगरकरांसाठी यापूर्वी पेक्षाही अधिक ताकदीने आम्ही लढत राहू, असे किरण काळे यांनी म्हटले आहे.

# महापालिका निवडणुकीत भाजपा-राष्ट्रवादी युतीचा ऐतिहासिक विजय

नगर - अहिल्यानगर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी किरकोळ वाद वगळता शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. प्रशासनाने दिलेल्या अंतरीम आकडेवारीनुसार सरासरी ६४.३५ टक्के मतदान झाले. १७ प्रभागात ६८ जागांपैकी ५ जागा बिनविरोध झालेल्या असून ६३ जागांसाठी २८३ उमेदवार रिंगणात होते.

नागापूर एमआयडीसी परिसरातील वखार महामंडळाच्या गोडावूनमध्ये स्ट्राँग रूम तयार करण्यात आली होती. मतदानानंतर सर्व ईव्हीएम मशीन येथे रात्री उशिरा सुरक्षितपणे ठेवण्यात आल्या. १६ जानेवारीला सकाळी ९.३० वाजता उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत तसेच मुख्य निवडणूक निरीक्षक आदित्य जीवने, निवडणूक निरीक्षक श्रीमंत हारकर आणि मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी तथा मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्या समक्ष स्ट्राँग रूम उघडण्यात आली. मतमोजणीसाठी एकूण ६८ मतमोजणी पर्यवेक्षक व ६८ मतमोजणी सहायकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सकाळी १० वाजता सर्वप्रथम टपाली मतपत्रिकांची मोजणी सुरु झाली. त्यानंतर ईव्हीएममधील मतांची मोजणी सुरु करण्यात आली. प्रत्येक प्रभागासाठी टपाली मतदानासाठी एक टेबल तर ईव्हीएम मशीनसाठी तीन टेबलांची व्यवस्था करण्यात आली होती. त्यानुसार टपाली मतदानासाठी १७ टेबल व ईव्हीएमसाठी ५१ टेबल, अशा एकूण ६८ टेबलांवर मतमोजणी करण्यात आली. मतमोजणी प्रक्रिया शांततेत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी कडेकोट पोलीस बंदोबस्तासह सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या होत्या.

मतमोजणी सुरु झाल्यावर जवळपास सर्वच प्रभागांमध्ये राष्ट्रवादी भाजपा युतीचे उमेदवार सुरुवातीपासूनच आघाडीवर राहिले आणि ही आघाडी शेवटपर्यंत कायम राहिली.

### महाविकास आघाडीचा सुपडा साफ

महाविकास आघाडीला या निवडणुकीत मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी मतदारांना गृहीत धरल्यामुळे त्यांचे निवडणुकीचे गणित चुकले. भाजपा आणि राष्ट्रवादी युती तसेच स्वबळावर लढणाऱ्या शिंदे सेनेने ही निवडणूक गांभीर्याने घेत उमेदवारी ठरविण्यापासून प्रचाराचे नियोजन केले. वरिष्ठ नेत्यांनीही या नियोजनाकडे लक्ष दिले. या उलट महाविकास आघाडी सुरुवातीपासूनच यामध्ये कमी पडत गेली. तिन्ही पक्षाचे वरिष्ठ नेते नगरकडे फिरकले नाहीत. त्यामुळे बहुतांश प्रभागात भाजपा राष्ट्रवादी युती विरुद्ध शिंदेसेना अशीच लढत पाहायला मिळाली. परिणामी महाविकास आघाडीचा या निवडणुकीत सुपडा साफ झाला.

## प्रमुख पराभूत

प्रभाग क्रमांक ३ अ मधून शिवसेना शिंदे गटाचे चंद्रकांत (काका) शेळके, अपक्ष उमेदवार रसिक ग्रुपचे जयंत येलूलकर, भाजपच्या उषा नलावडे.
प्रभाग क्रमांक ३ ब मधून शिवसेना शिंदे गटाच्या माजी नगरसेविका संगिता खरमाळे.
प्रभाग क्रमांक ४ अ मधून माजी नगरसेविका काँग्रेसच्या उमेदवार शेख नसीम खानसाहेब.
प्रभाग क्रमांक ४ ब मधून माजी नगरसेवक काँग्रेसचे उमेदवार शेख फयाजोद्दीन अजीजोद्दीन., माजी नगरसेवक मीर असिफ सुलतान., माजी नगरसेवक संजय गाडे., माजी नगरसेवक शेख मुदस्सर.
प्रभाग क्रमांक ४ ड मधून माजी नगरसेवक खान समद वहाब.
प्रभाग क्रमांक ५ अ मधून शिला दीप चव्हाण.,
प्रभाग क्रमांक ५ ब मधून माजी नगरसेवक प्रदीप परदेशी., माजी नगरसेवक अशोक दहिफळे.
प्रभाग क्रमांक ५ क मधून माजी नगरसेविका उषा उनवणे.,
प्रभाग क्रमांक ६ क मधून माजी नगरसेविका विणा श्रीनिवास बोज्जा.
प्रभाग क्रमांक ७ क मधून शिवसेना शिंदे गटाच्या सारिका हनुमंत भूतकर.
प्रभाग क्रमांक ७ ड मधून शिवसेना शिंदे गटाचे गोरख अर्जुनराव बोरुडे.
प्रभाग क्रमांक ८ क मधून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे बाबासाहेब संतोष नागरगोजे.
प्रभाग क्रमांक ९ अ मधून माजी नगरसेवक दीप चव्हाण.
प्रभाग क्रमांक ९ ब मधून भाजपच्या पद्मा विजयकुमार बोरुडे.
प्रभाग क्रमांक ९ ड मधून माजी नगरसेवक शिवसेना शिंदे गटाचे सचिन चंद्रशेखर शिंदे.
प्रभाग क्रमांक १० अ मधून भाजपचे महेंद्र बिज्ञा.
प्रभाग क्रमांक १० क मधून शिवसेना शिंदे गटाच्या अश्विनी सचिन जाधव
प्रभाग क्रमांक १० ड मधून शिवसेना शिंदे गटाचे सचिन जाधव., माजी नगरसेवक शेख मुदस्सर जहांगिर
प्रभाग क्रमांक ११ अ मधून भाजपचे विकास वाघ.
प्रभाग क्रमांक ११ ब मधून भाजपच्या सौ. दीप्ती सुवेंद्र गांधी.
प्रभाग क्रमांक ११ क मधून माजी नगरसेविका सोनाली अजय चितळे.
प्रभाग क्रमांक ११ ड मधून माजी नगरसेवक नरेंद्र कुलकर्णी.
प्रभाग क्रमांक १२ ड मधून माजी नगरसेवक शेख नजीर अहमद (नज्जू पहिलवान).
प्रभाग क्रमांक १३ अ मधून माजी नगरसेवक मनेष साठे.
प्रभाग क्रमांक १३ ब मधून शिवसेना शिंदे गटाच्या निर्मला कैलास गिरवले.
प्रभाग क्रमांक १५ ब मधून शिवसेना शिंदे गटाच्या नगरसेविका सौ. सुवर्णा दत्ता जाधव
प्रभाग क्रमांक १५ क मधून शिवसेना शिंदे गटाच्या नगरसेविका सौ. विद्या दिपक खैरे
प्रभाग क्रमांक १५ ड मधून शिवसेना शिंदे गटाचे अनिल शिंदे.
प्रभाग क्रमांक १६ ब मधून शिवसेना शिंदे गटाच्या नगरसेविका सौ. सुनिता संजय कोतकर., माजी नगरसेविका सविता अशोक कराळे.
प्रभाग क्रमांक १६ क मधून शिवसेना शिंदे गटाचे ओंकार दिलीप सातपुते.
प्रभाग क्रमांक १६ ड मधून माजी नगरसेवक हर्षवर्धन महादेव कोतकर.
प्रभाग क्रमांक १७ ब मधून माजी नगरसेविका गौरी गणेश ननावरे.

# महापालिका निवडणुकीतही पुन्हा तोच गोंधळ

राज्यातील २९ महापालिकांसाठी मतदान यंदा गोंधळातच पार पडले. तब्बल ८ वर्षानंतर निवडणूक लागल्याने यंदा मुंबई-ठाणे वगळता मतदारांमध्ये कमालीचा उत्साह होता. मतदानाचा टक्का वाढावा यासाठी सरकारसह, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, मंडळे तसेच राजकीय पक्षांनीही यंदा बरेच परिश्रम केले. मतदान वाढावे यासाठी सामाजिक माध्यमे तसेच तंत्रज्ञानाचाही पुरेपूर वापर करण्यात आला होता, सामान्य नागरिकांनीही आपल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवरून आपल्या मित्र मंडळींना, फॉलोअर्सना मतदान करण्याचे आवाहन केले होते. इतक्या मोठ्या प्रमाणात जागृती करूनही दरवेळेस जे होते ते यावेळेसही झाले. मुंबईतील मतदानाचा टक्का काही वाढला नाही.

लोकसभा, विधानसभा यानंतर आता महापालिका निवडणुकांतही निवडणूक आयोगाच्या ढिसाळ कारभारामुळे मतदारांचे नाहक हाल झाले. महापालिका वार्डांच्या पुनर्रचनेमुळे कितीतरी मतदारांची नावे विभागली गेली. ज्यामुळे मतदारांना आपली नावे शोधण्यासाठी एका मतदान केंद्रावरून दुसऱ्या मतदान केंद्रावर फेऱ्या माराव्या लागत होत्या. कित्येक मतदारांची नावे मतदार याद्यांमधून गायब झाली होती. मुंबईतील घर भाड्याने देऊन राहण्यासाठी मुंबई बाहेर गेलेले अनेक जण मतदानासाठी मुंबईत आले होते. अशांपैकी अनेकांची नावे मतदार यादीतून गायब झाल्याने त्यांना मतदान न करताच परतावे लागले. घरातील ४ सदस्यांपैकी एका सदस्याचे नाव मतदार याद्यांतून गायब झाल्याने ते शोधण्यामध्ये राजकीय पक्षांच्या बुथवर बसलेल्यांची दमछाक होत होती. एकेकाचे नाव शोधण्यात बराच वेळ लागत असल्याने अनेक बुथवर नागरिकांचे मोठे घोळके झाल्याचे चित्र पाहायला मिळत होते. विशेष म्हणजे ज्यांनी विधानसभा निवडणुकीला मतदान केले अशांचीही नावे काही ठिकाणी लुप्त झाली होती.

अनेक ठिकाणी मृत व्यक्तींची नावे मतदार याद्यांत पुन्हा समाविष्ट झालेली पाहायला मिळत होती. निवडणूका दर वर्षी होत नसल्या तरी निवडणूक आयोग निवडणूक जवळ आल्यावरच जागे होते का ? भारतात प्रत्येकाचे आधार कार्ड, पॅन कार्ड, रेशन कार्ड, बँकेतील खाती सरकारने एकमेकांशी लिंक करून घेतली आहेत. एकदा नोंदवलेली नावे अन्य कोणत्याही ठिकाणाहून लुप्त होत नाहीत मग मतदार याद्यांमधूनच ती कशी गायब होतात ? मृत व्यक्तीची सरकार दरबारी नोंद करणे आता सर्वत्र अनिवार्य करण्यात आले आहे. मृत व्यक्तीचे मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र निघाल्यावरही मतदार याद्यांमधून ते नाव का काढले जात नाही किंवा एकदा काढलेले नाव पुढच्या निवडणुकीच्या वेळी यादीमध्ये कसे काय जोडले जाते ? निवडणूक जाहीर होण्यापूर्वी मतदार याद्या अद्यावत करण्याचे काम कोणाचे आहे ? विधानसभा निवडणुका झाल्यानंतर महापालिकेच्या निवडणुका जाहीर होण्यात बराच कालावधी होता. या काळात याद्या अद्यावत का करण्यात आल्या नाहीत असा संतप्त सवाल मतदारांच्या मनात निर्माण होताना दिसला.

शहरांत दरवेळी मतदानाची वेळ सकाळी ७ ते सायंकाळी ६ पर्यंत असते. यंदा सकाळी आणि संध्याकाळी दोन्ही ठिकाणी अर्धा अर्धा तास कमी केल्याचे अनेकांना ज्ञात नव्हते त्यामुळे मतदान करून सकाळी लवकर कामावर जाणाऱ्यांसह नागरिकांना मतदान केंद्रांवर सकाळी अर्धा तास विनाकारण तिष्ठत राहावे लागले. वेळेचे गणित बिघडल्याने काहीजण मतदान न करताच कामावर जाताना दिसले. हीच स्थिती सायंकाळी पाहायला मिळाली. साडेपाचनंतर धावत पळत मतदान केंद्रांवर जाणाऱ्यांना मतदान न करताच परतावे लागले. दुबार मतदारांमुळे अनेक ठिकाणी गोंधळाची परिस्थिती झालेली पाहायला मिळाली. या निवडणुकीत मतदान यंत्राच्या शेजारी व्हीव्हीपॅट यंत्र पाहायला न मिळाल्याने आपले मत नक्की आपल्या उमेदवारालाच गेले आहे कि अन्य कोणाला असा प्रश्न मतदारांना पडत होता. अनेक ठिकाणी निवडणूक कर्मचारी कामात मुद्दामहून दिरंगाई करताना दिसून आले ज्यामुळे मतदान अत्यंत धीम्या गतीने होत होते अशा ठिकाणी मतदारांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या ज्यामुळेही काही मतदार मतदान न करताच मागे फिरकताना पाहायला मिळाले. मतदारांच्या बोटाला शाई लावण्यासाठी यंदा पहिल्यांदाच मार्करचा वापर करण्यात आला होता. ही शाई सॅनिटायजर लावून जात असल्याने बोगस मतदान होण्यासाठीच ही नवीन पद्धत निवडणूक आयोगाने वापरली का असा थेट सवाल राजकीय नेत्यांकडून निवडणूक आयोगाला करण्यात येत होता. काही ठिकाणी यंदा पहिल्यांदाच पॅनल पद्धत अवलंबली गेल्याने आणि अनेक नागरिकही या नवीन पद्धतीविषयी अनभिज्ञ असल्याने गोंधळ निर्माण झालेला पाहायला मिळाला. या नव्या पद्धतीमुळे मतदान केंद्रावर मतदारांचा बराच वेळ जात होता ज्यामुळे अशा ठिकाणी मतदारांच्या लांब रांगा लागलेल्या पाहायला मिळाल्या. हल्ली प्रत्येक निवडणुकीतील निवडणूक आयोगाचा हा भोंगळ कारभार नागरिकांमध्ये निवडणूक प्रक्रियेविषयी अविश्वास तर निर्माण करतोच, शिवाय बोगस मतदानासही वाव मिळवून देत आहे असे मत राजकीय जाणकारांकडून व्यक्त केले गेले आहे. याशिवाय अनेक मतदार याद्यांमध्ये महिला मतदाराच्या नावासमोर पुरुषाचे छायाचित्र तर पुरुष मतदारांच्या नावापुढे महिलेचे छायाचित्र लावल्याचे दिसून आले. काही ठिकाणी ईव्हीएम मशिन्स बंद पडल्याने मतदारांचा संताप अनावर झालेला पाहायला मिळाला.

आपल्या जिल्ह्याचे भवितव्य ठरवणारी निवडणूक निर्विघ्न पार पडावी, नागरिकांनी या प्रक्रियेत एकदिलाने सहभाग घ्यावा यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो; मात्र प्रशासनाचा भोंगळ कारभार आणि नागरिकांचा निरुत्साह यांमुळे हे गणित कधी साधलेच जात नाही. नागरिकांना पुन्हा पुन्हा आवाहन करूनही नागरिक आपली नावे मतदार याद्यांमध्ये आहेत कि नाही याबाबत आधीच खात्री करून घेत नाहीत. शहरासारख्या ठिकाणी आज प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आहे. निवडणूक याद्यांमध्ये आपले नाव पडताळण्याची पद्धतसुद्धा प्रशासनाने अत्यंत सोपी केली आहे, तरीही नागरिक मतदार यादीतील आपले नाव शोधण्याचा प्रकार ऐन निवडणुकीच्या दिवशी करतात ज्यामुळे त्यांनाही हाल सहन करावे लागतात. केवळ मतदारांना मतदान करण्यास उद्युक्त करणे पुरेसे नसून घरोघरी जाऊन घरातील सर्व प्रौढ व्यक्तींची नावे मतदार याद्यांमध्ये समाविष्ट आहेत का ? घरातील मृत व्यक्तींची नावे याद्यांतून काढली गेली आहेत का ? नवीन मतदारांची नावे याद्यांमध्ये समाविष्ट झाली आहेत का ? या सर्व पडताळण्या निवडणुकीच्या आधी व्हायला हव्यात त्यासाठी निवडणूक प्रशासनाने स्वयंसेवी संघटना आणि राजकीय पक्ष यांचे साहाय्य घ्यायला हवे. निवडणूक केंद्राच्या ठिकाणी मतदारांसाठी आवश्यक सुविधा करण्यात आल्या आहेत ना ? ज्या ठिकाणी लोडशेडिंग केली जाते अशा केंद्रांमध्ये जनरेटर आदी व्यवस्था केलेल्या असाव्यात. सर्व मतदान केंद्रामध्ये पुरेशा सुविधांची उपलब्धता केल्याची खात्री प्रमुख पक्षांच्या स्थानिक प्रतिनिधींकडूनही आदल्या दिवशी करून घेतली जावी. यंदाच्या महापालिका निवडणूक प्रक्रियेतून निवडणूक प्रशासन, राजकीय पक्षांसह नागरिकांनीही बोध घेऊन त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

## लिलावती जाधव यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - माळीवाडा, गोंधळे गल्ली येथील रहिवाशी लिलावती किसन जाधव (वय ९५) यांचे १० जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या मनमिळावू स्वभावाच्या होत्या. त्यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळाला होता. त्यांच्यावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे एक मुलगा, चार मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## रमेश परदेशी (माळवाळ) यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - ए.डी.सी.सी बँक कॉलनी, संगमनेर रोड, हिरो शो-रूम समोर, येथील रहिवाशी रमेश अहिलाजी परदेशी (माळवाळ) (वय ७४) यांचे १५ जानेवारी रोजी अल्पशः आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुन, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. संगमनेररोड येथील जवाहर कारखाना समोरील स्वामी ऑटो पार्टस ॲण्ड वर्कशॉपचे मालक प्रशांत परदेशी, सायंटिस्ट शैलेश व सतिश परदेशी (माळवाळ) यांचे वडील, प्रविण, हर्षद व हितेश परदेशी (माळवाळ) यांचे चुलते होत.

## सुमन कडू यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील उक्कलगाव, खानापूर व शिरसगाव येथील अशोक एज्युकेशन संस्थेच्या सेवानिवृत्त शिक्षिका सुमन शंकरराव कडू (वय ७६) यांचे अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, दिर, सून, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे.शिर्डी येथील साईबाबा संस्थान हॉस्पिटलच्या वैद्यकिय अधिकारी डॉ. सुनीता कडू (मिरवणकर) व सुजित कडू यांच्या मातोश्री, पुणतांबा येथील आशा केंद्रच्या डॉ.स्मिता कडू यांच्या सासूबाई होत.

## अर्जुनराव वाघ यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - रामचंद्रनगर, डावखर मळा, वॉर्ड नं.७ येथील अर्जुनराव शंकरराव वाघ (वय ८०) यांचे काल रात्री ११:१० वा. अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक भाऊ, एक मुलगा, दोन मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बेलापूररोड येथील पूर्वीचे ओझा पेट्रोल पंप शेजारील समाधान सलूनचे मालक दिनेश वाघ यांचे वडील, रामभाऊ वाघ यांचे धाकटे बंधू, गणेश, चंद्रशेखर, मनोज व मच्छिंद्र (बंटी) यांचे चुलते, चि.भावेश व सोहम वाघ यांचे आजोबा होत.

# प्रलंबित देयके तत्काळ अदा न झाल्यास 'शिक्षण आयुक्तालया'वर आक्रोश मोर्चा

**शिक्षकांच्या थकीत वेतनावरून 'शिक्षक भारती' आक्रमक; आमदार सत्यजित तांबे यांची शिक्षण संचालकांशी थेट चर्चा**

नगर - गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असलेली न्यायालयीन प्रकरणे आणि शिक्षकांची थकीत वेतन देयके अदा करण्यास टाळाटाळ करणाऱ्या प्रशासनाविरुद्ध 'शिक्षक भारती' संघटनेने आता थेट राजकीय आणि प्रशासकीय संघर्षाचे हत्यार उपसले आहे. नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे यांनी या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन शिक्षण संचालक महेश पालकर यांच्याशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली. प्रशासकीय दिरंगाईमुळे शिक्षकांवर होणारा अन्याय आता सहन केला जाणार नाही, असा इशारा यावेळी देण्यात आला.



शिक्षकांच्या थकीत वेतनावरून आमदार सत्यजित तांबे यांची शिक्षण संचालकांशी चर्चा करून निवेदन दिले.

नेमके प्रकरण काय? शिक्षक भारती संघटनेने दिलेल्या निवेदनानुसार, उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतानाही गेल्या दोन वर्षांपासून शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची थकीत देयके रोखून धरण्यात आली आहेत. शिक्षण संचालकांनी १३ जून २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार ५ जुलै २०२५ पर्यंत ही देयके शाळा स्तरावरून ऑनलाइन अपलोड करणे बंधनकारक होते. मात्र, आजही ही देयके शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अहिल्यानगर व वेतन अधीक्षक (माध्यमिक) कार्यालय, अहिल्यानगर येथे प्रलंबित असल्याचे संघटनेने निदर्शनास आणून दिले आहे.

आमदार तांबे यांचा पुढाकार - संघटनेच्या शिष्टमंडळाने १६ जानेवारी रोजी आमदार सत्यजित तांबे यांची भेट घेऊन शिक्षण विभागाच्या ढिसाळ कारभाराचा पाढा वाचला. यावेळी आमदार तांबे यांनी तत्काळ शिक्षण संचालक महेश पालकर यांच्याशी संपर्क साधून वस्तुस्थिती मांडली. न्यायालयाने आदेश देऊनही प्रशासन दोन वर्षे विलंब का लावत आहे, असा सवाल करत त्यांनी या प्रकरणात तत्काळ लक्ष घालण्याच्या सूचना केल्या. प्रशासनाच्या या उदासीन धोरणामुळे शिक्षक वर्गात तीव्र असंतोष पसरला असून, ही परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी तोडगा काढण्याची मागणी तांबे यांनी केली.

आश्वासनांची पायमल्ली- यापूर्वी १४ ऑक्टोबर २०२५ रोजी शिक्षक भारतीच्या वतीने शिक्षण संचालक कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी प्रशासनाने मार्च २०२५ अखेरपर्यंत सर्व देयके अदा करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र ते पाळले गेले नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाला स्थानिक स्तरावर 'केराची टोपली' दाखवली जात असल्याचे संतापजनक चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

### आक्रोश आंदोलनाचा इशारा

जानेवारी २०२६ अखेरपर्यंत जर ही सर्व न्यायालयीन थकीत देयके मिळाली नाहीत, तर शिक्षक भारती संघटना शिक्षण आयुक्तालय, पुणे येथे 'प्रचंड आक्रोश आंदोलन' करणार आहे, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

यावेळी पुणे विभागाचे कार्याध्यक्ष प्रा.महेश पाडेकर, अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष प्रा. रामराव काळे, विनाअनुदान विरोधी संघर्ष समितीच्या राज्याच्या महिला अध्यक्ष रूपालीताई कुरुमकर, जिल्हा संघटक चंद्रशेखर हासे, सोपान कोरडे, गंगाराम साबळे, डॉ. अनिल धीवर, रामदास मुर्तडक आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## रमेश कानडे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - गुंडेगाव येथील रहिवाशी व बांगड्याचे विक्रेते रमेश बलभिम कानडे (वय ५४) यांचे १६ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर गुंडेगाव गावठाण येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, भावजय असा परिवार आहे.



ग्रामीण भागाप्रमाणे शहरात सुद्धा संक्राती ते रथसप्तमीपर्यंत पहिल्या वर्षी लहान मुलांना उत्तम आरोग्यासाठी, बदलत्या ऋतूचा परिणाम होऊ नये म्हणून बोर, उसाचे तुकडे, भुईमुगाच्या शेंगा डोक्यावर टाकून १० महिन्याच्या गौरांश या शिशुला बोरन्हाण घालताना सुवासिनी. (छाया - विजय मते)

# अहमदनगर महाविद्यालयात बीबीए विभागातर्फे २१ जानेवारी रोजी 'नेक्सजेन- २०२६' प्रदर्शन




नगर - अहमदनगर महाविद्यालयात बीबीए विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी नेक्सजेन २०२६ प्रदर्शनाचे २१ जानेवारी रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात खरेदी व विक्रीचा अनुभव सर्व नगरकरांना घेता येणार आहे. प्रदर्शन अहमदनगर महाविद्यालय येथील प्ले ग्राऊंडवर होत आहे.

प्रदर्शनात विविध प्रकारचे ५० पेक्षा जास्त स्टॉल्स् आहेत. त्यामध्ये कपडे, मोबाईल, अॅक्सेसरीज, ज्वेलरी, विधि एज्युकेशन इन्स्टिट्यूट, ऑटोमोबाईल्स् आणि फूड स्टॉल्स् आहेत.

सर्व नगरकरांनी प्रदर्शनात खरेदीचा आनंद घ्यावा, असे आवाहन विद्यार्थ्यांच्यावतीने करण्यात आले आहे. विभागप्रमुख डॉ. तुषिता अय्यर व सर्व प्राध्यापक वृंद विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत. या कार्यक्रमाला आमदार संग्राम जगताप यांची उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे दुपारी ४ वा. नंतर लाईव्ह म्युझिक कॉन्सर्ट असणार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### अंजीर खा वजन कमी करा

आजकाल वजन वाढणे ही एक सामान्य समस्या बनली आहे आणि लोक ते व्यवस्थापित करण्यासाठी नैसर्गिक आणि निरोगी पर्याय शोधतात. अशा परिस्थितीत, तुमच्या आहारात अंजीरचा समावेश करणे फायदेशीर ठरू शकते. कमी करणे कठीण वाटू शकते, परंतु योग्य सुपरफूड्स ते सोपे करू शकतात. अंजीर हे एक असे फळ आहे जे केवळ स्वादिष्टच नाही तर वजन कमी करण्यासाठी देखील अविश्वसनीयपणे उपयुक्त आहे. फायबरने समृद्ध, ते भूक नियंत्रित करतात आणि चयापचय वाढवतात. जर तुम्हाला प्रश्न पडत असेल की वजन कमी करण्यासाठी तुम्ही दररोज किती अंजीर खावेत जाणून घेऊ या. वजन कमी करण्यात चांगले पचन महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. अंजीर आतड्यांचे आरोग्य राखण्यास मदत करतात आणि शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करतात. जेव्हा पचन चांगले असते तेव्हा शरीर पोषक तत्वांचा अधिक चांगल्या प्रकारे वापर करू शकते. अंजीरमधील अँटीऑक्सिडंट्स शरीराला मुक्त रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानापासून वाचवतात. हे घटक शरीराला आतून निरोगी ठेवतात, ज्यामुळे संतुलित आणि सुरक्षित वजन कमी करण्याची प्रक्रिया होते.

## पाककला

### उपवास फ्रूट चाट

**साहित्य** – सफरचंद – १, केळी – २, पपई – १ कप, डाळिंब – १, द्राक्षे – १ कप, काळी द्राक्षे – १ कप, पेरू – १, साखर – ३ चमचे, लिंबाचा रस – १ चमचा, भाजलेले जिरे पावडर – १/२ चमचा, रॉक मीठ चवीनुसार

कृती : सर्वात आधी सर्व फळे स्वच्छ धुवा आणि वाळवण्यासाठी एका टोपलीत ठेवा. सर्व पाणी बाष्पीभवन झाल्यावर, सफरचंद आणि पेरूचे एक इंच तुकडे करा. पपई आणि केळी सोलून त्यांचे एक इंच तुकडे करा. आता एका भांड्यात, द्राक्षे, काळी द्राक्षे, डाळिंबाचे दाणे, सर्व चिरलेली फळे, साखर, रॉक मीठ आणि भाजलेले जिरे पावडर घाला आणि मिक्स करा. तर चला तयार आहे पौष्टिक फळांचा चाट. उपवासासाठी हा फ्रूट चाट बनवू शकता. या फ्रूट चाटमध्ये तुम्ही तुमच्या आवडीचे कोणतेही फळ वापरू शकता.

## वास्तू

### ऑफिस फर्निचर

* उत्तरेकडील वर्कस्टेशन्ससाठी फाईल्स, कागदपत्रे आणि संगणकासारख्या इलेक्ट्रॉनिक उपकरणे सारख्या गोष्टी टेबलच्या डाव्या बाजूला ठेवल्या पाहिजेत.
* पूर्वेकडील वर्कस्टेशन्समध्ये साठवण्याची जागा उजव्या बाजूला असावी.
* वर्कस्टेशन्स किंवा टेबल कधीही एल-आकाराचे किंवा इतर कोणत्याही अनियमित आकाराचे नसावेत कारण यामुळे गोंधळ आणि कामाच्या वितरणात विलंब होऊ शकतो.

## सौंदर्य

निरोगी त्वचेसाठी दिवसातून दोनदा त्वचेची स्वच्छता करणे, टोनर आणि मॉइश्चरायझर लावणे आवश्यक आहे. शिवाय दिवसभरात त्वचेवर साचलेली सर्व घाण आणि धूळ काढून टाकण्यासाठी झोपण्यापूर्वी तुमचा चेहरा पूर्णपणे स्वच्छ करा.

## सल्ला

उरलेली डाळ, भात किंवा भाजीचा वापर एक नवीन रेसिपी बनवण्यासाठी करा, जसे की भातापासून फ्राइड राइस किंवा डाळीपासून पराठा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, पौष कृष्णपक्ष, मूळ ०८।७२, सूर्योदय ०६ वा. ४१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : व्यापार-व्यवसायात परिस्थिती मध्यम राहील. कोणत्याही प्रकारचे जोखिम टाळा.

**वृषभ** : जर आपणास एका कार्यात वाढ मिळाली तर इतर कार्यात अवनती होणे शक्य आहे.

**मिथुन** : धार्मिक भावना वाढेल. सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल सहकार्यांबरोबर प्रतिष्ठा वाढेल.

**कर्क** : वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. पत्नीपासून सुख मिळेल.

**सिंह** : गृह भूमीसंबंधी विषयांमध्ये लाभ मिळेल. जुन्या मित्रांचा सहवास लाभेल.

**कन्या** : व्यवसायासाठी उत्तम वेळ. नवीन कामात यश मिळेल.

**तूळ** : आपल्या आत्मविश्वासाचा स्तर वाढविण्याचा प्रयत्न करा.

**वृश्चिक** : सामाजिक क्षेत्रांमध्ये अजून काही विशेष कार्ये होणार नाही.

**धनु** : एखादी व्यक्ती निष्कारण आपल्याला त्रास देईल मात्र शत्रू प्रभावहीन पडतील. वैवाहिक सुख वाढेल.


**मकर** : आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल.

**कुंभ** : आपला निष्काळजी दृष्टीकोण आज चांगला ठरणार नाही.

**मीन** : घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. शत्रू प्रभावहीन ठरतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७३४७ सौ.शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :-** १) अशा प्रकारचा ; असला ३) रागावलेला; कोपलेला ७) लग्न किंवा मुंजीत अक्षता टाकताना म्हणतात ते काव्य ८) उंच उडणारा एक पक्षी ९) फळातील रसाळ भाग; मगज १०) अंजन; काजळ; कज्जल ११) एकावर एक अशी रचना करून खेळला जाणारा एक खेळ १३) जनावरे जिला बांधतात ती जमिनीत मारलेली खुंटी १४) पूर्वीची एक लेखणी १७) कपटी; कारस्थानी २०) पुन्हा पुन्हा २२) शक्तिमान; कणखर; दणकट २३) रत्नाकर; मकरालय; समुद्र २४) मधाच्या पोळ्यातील चिकट पदार्थ

**उभे शब्द :-** १) मंगल नसलेले; अशुद्ध २) समुद्रातील गुळगुळीत दगड; गजगा ३) घरटे; तक्ता; पत्रक ४) साखर वगैरेचा कढविलेला रस; रांधा; शुद्ध ५) मागे पाऊल; मागे सरणे ६) मऊपणा; मृदुता; मवाळकी १०) संतोष; आनंद; मनास वाटणारी स्वस्थता १२) एकेक बाब घेऊन १३) विश्वामित्र ऋषींना भुलविणारी एक अप्सरा १५) एक मांसाहारी खाद्यपदार्थ १६) 'ज्ञानेश्वरी'ची रचना जेथे झाली ती नगरी १८) बैलाला नियंत्रणात ठेवण्यासाठी त्याच्या नाकातून ओवतात ती दोरी १९) लवकर; ढग; मेघ; कमी वेळेत २१) मौज; रंगविण्याचे साधन; कलर

### शब्दगंध क्र. ७३४६ चे उत्तर



### फिल्मीचक्कर क्र. १२२० चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : मोठा तोच जो आपल्या सोबतच्याला छोटा समजत नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### फुटबॉल गोल नेटचा शोध कसा लागला?

आपण युरोचे सामने थक्क होऊन पाहत असताना जग फुटबॉलने वेडे झाले आहे. १८८९ मध्ये, फुटबॉलचे खेळ खूप वेगळे दिसत होते. नेट नसल्याने, चेंडू मागे गेला की पोस्टमधून गेला यावर वारंवार मतभेद होत असत.

ऑक्टोबर १८८९ मध्ये एव्हर्टन आणि ॲक्रिंग्टन यांच्यातील सामन्यात गोल करण्यास परवानगी न मिळाल्यावरून झालेल्या वादामुळे तरुण सिव्हिल इंजिनियर जॉन अलेक्झांडर ब्रॉडी यांना यावर उपाय शोधण्यास प्रेरित केले: चेंडू गोलमधून गेल्यानंतर त्याला पकडण्यासाठी जाळी. १८९० मध्ये ब्रॉडीने या शोधाचे पेटंट घेतले.

लवकरच फुटबॉल असोसिएशन (एफए) ने ते स्वीकारले आणि १८९१ मध्ये पहिल्यांदा एफए कप फायनलमध्ये त्याचा वापर करण्यात आला.

सप्टेंबर १८९१ पासून सर्व लीग सामन्यांसाठी आणि १८९४ पासून सर्व एफए कप सामन्यांसाठी नेट अनिवार्य केले. त्याच्या कारकिर्दीच्या सुरुवातीला, ब्रॉडीने पहिल्या महायुद्धात प्रथम वापरले जाणारे स्टील कॉम्बॅट हेल्मेट, ब्रॉडी हेल्मेट डिझाइन आणि पेटंट केले. युद्धादरम्यान सैनिकांना श्रापनेल आणि ढिगाऱ्यांपासून वाचवण्यासाठी डिझाइन केलेले, धातू नसलेल्या हेड्वेअरसाठी हे एक मजबूत पर्याय होते.

### अभिमान

एकदा, सूर्य आणि वारा यांच्यात अचानक वाद झाला. ते दोघांपैकी सर्वात शक्तिशाली कोण आहे यावर वाद घालू लागले. वारा खूप अहंकारी आणि हट्टी होता. तसेच त्याला त्याच्या शक्तीचा खूप अभिमान होता. त्याचा असा विश्वास होता की जर तो पुरेसा वेगाने वाहू लागला तर तो मोठी झाडे उपटून टाकू शकतो. ह

यातील ओलावा नद्या आणि तलावांमधील पाणी देखील गोठवू शकतो. या अहंकारामुळे, वारा सूर्याशी वाद घालत म्हणाला, मी तुझ्यापेक्षा जास्त शक्तिशाली आहे.

जर मला हवे असेल तर मी माझ्या शक्तीने कोणालाही हलवू शकतो. सूर्याने वाऱ्यावर विश्वास ठेवण्यास नकार दिला आणि शांतपणे म्हणाला, पाहा, तुम्ही कधीही स्वतःचा अभिमान बाळगू नका.

यामुळे वारा चिडला आणि तो अधिक शक्तिशाली असल्याचा दावा करत राहिला. ते वाद घालत असताना, त्यांना अचानक रस्त्यावर एक माणूस दिसला. त्या माणसाने कोट घातला होता. हे पाहून सूर्य एक योजना घेऊन आला. तो वाऱ्याला म्हणाला, जो कोणी या माणसाला त्याचा कोट काढण्यास भाग पाडेल तो अधिक शक्तिशाली मानला जाईल.

वारा सहमत झाला आणि म्हणाला, ठीक आहे. मी आधी प्रयत्न करेन. तोपर्यंत, तू ढगांमध्ये लपून राहा. सूर्य ढगांच्या मागे लपला. मग वारा वाहू लागला. तो हळूहळू वाहू लागला, पण त्या माणसाने त्याचा कोट काढला नाही. मग तो अधिक वेगाने वाहू लागला. वारा वाढताच त्या माणसाला थंडी जाणवू लागली आणि त्याने त्याचा कोट स्वतःभोवती घट्ट गुंडाळला.

थंड आणि जोरदार वारा बराच वेळ वाहत राहिला, पण त्या माणसाने त्याचा कोट काढला नाही. शेवटी, वारा थकला आणि शांत झाला.

मग सूर्याची पाळी आली. तो ढगांमधून बाहेर आला आणि मऊ सूर्यप्रकाशाने चमकू लागला. सूर्य जसजसा चमकू लागला, तसतसे त्या माणसाला थंड तापमानापासून थोडीशी आराम वाटला, म्हणून त्याने त्याचा कोट सैल केला. यानंतर, सूर्य पुन्हा तेजस्वीपणे चमकू लागला आणि सूर्य अधिक तेजस्वी झाला. सूर्य जसजसा तेजस्वी होत गेला तसतसे त्या माणसाला उष्णता जाणवू लागली आणि त्याने त्याचा कोट काढला.

जेव्हा वाऱ्याने हे पाहिले तेव्हा त्याला त्याची चूक कळली आणि त्याने सूर्यासमोर पराभव स्वीकारला.

तात्पर्य : कधीही स्वतःच्या क्षमता आणि ताकदीचा अभिमान बाळगू नये.

## जीवन का अमृत (भाग १)



### दिव्य दया

९८. मुझे यह जानकर खुशी हुई कि आए सतुरु की दया से, भजन सिमरन में प्रेम भाव से समर्पित हैं। आपके धुन के अभ्यास में नया विकास होना, यानि आवाज़ का तीव्र होकर सिर के बीच में से आना, शुभ है, क्योंकि दायीं ओर से आने वाली आवाज़ अंत में सिर के ऊपर से आने लगती है।

और आपने धुन के अभ्यास

को बढ़ाकर, एक समय में लगातार ५० से ७० मिनट तक धुन को सुनना शुरू कर दिया है। यह असाधारण दिव्य दया का नतीजा है और आप जरूर ही जबरदस्त आनंद और शांति का लाभ उठा रहे होंगे। यह सतुरु की दुर्लभ दया होती है, जब अनुशासित नामलेवा का मन, पवित्र शब्द, जो कि आनंद का स्रोत है, में विश्राम करता है। आप प्रेम, शक्ति और दिव्य ज्ञान के क्षेत्रों में, सतुरु की दया से, उन्नति करेंगे।

आपके दृष्टि अभ्यासों में भी उन्नति उतनी ही शुभ है, जिनमें आप कुछ ज्योतियाँ और कभी-कभी और दृश्य देखते हैं। इस मार्गदर्शक सिद्धांत का कि अंतर में जो कुछ भी देखों, उसके मध्य में एकाग्रचित होकर देखते रहो और दायीं ओर से आने वाली शब्द की धारा को सुनो, तन-मन से पालन करना चाहिए। बाकी सब उसकी दया से अपने आप होगा। पवित्र शब्द को तन्मयता से सुनो, जिससे आप परमानंद और दिव्य हर्षोन्माद से भर जाओगे ।

९९. यह बहुत अच्छा है कि आप दिन की शुरुआत और उसका अंत पवित्र नामों के जाप से करते हैं। ये पवित्र नाम सतुरु के जीया दान (जिंदगी का दान) से अभिमंत्रित (सिद्ध) होते हैं और उनके सिमरन से आप उससे दया की प्रार्थना करते हैं। आप ज्यादा से ज्यादा कोशिश करें कि हर खाली क्षण में आप इन सिद्ध नामों का जाप करें और अपने आप को सतुरु की मीठी याद में डुबोए रखें।

१००. जिस दिन से शिष्य जिंदा सतुरु के चरणों में आता है और अंतर में पवित्र नाम से जुड़ जाता है, तभी से उसे दया और संरक्षण, लगातार बहुतायत में मिलने लगते हैं। जो आज्ञाकारी हैं और प्रेम से भरे हैं, वे ग्रहणशील बन जाते हैं और इस दया और संरक्षण से अपनी जिंदगी समृद्ध बनाते हैं और दूसरे के लिए प्रेरणा का स्रोत बनते हैं। अंतर के अलौकिक अनुभव सतुरु की दया से मिलते हैं और शिष्य कभी भी यह नहीं कह सकता कि ये उसे स्वयं की कोशिश से मिले हैं, चाहे उसकी कोशिशें कितनी भी उत्तम क्यों न प्रतीत हो। पर यह अति आवश्यक है कि आप दृढ़ता से उसका कहा मानें, ताकि उसकी दया और आशीर्वाद को पा सकें। यह शिष्य का आंतरिक अनुभव नहीं है, जो उसके

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### तृप्त आत्मा

ये जो दुनिया में दुःखी लोग हैं इनके दुख में हमारा हाथ था। अब वह हताश हो कर कभी कभी अपने पूर्वजों को कोसते हैं, तो उनके इन प्रलापों के कारण हमारी मनोदशा बदल जाती है। उनकी आहें हमें चौन नहीं लेने देती।

ऐसे ही हमारे विचार भी दूसरो तक पहूंचते हैं। जब भी कोई नकारात्मकता मन में आये तो तुरंत समझ जाओ कोई आत्मा मुझ दुःखी है। वह कौन है यह पता नहीं लगेगा और कई बार पता लग जायेगा। इस स्थिति में बाबा (ईश्वर) या अपने इष्ट को सामने देखो और कहो आप शांति के सागर हैं, आप प्यार के सागर हैं, आप सुख के सागर हैं, आप की शक्ति से सारे विश्व की आत्माओं को और उन

आत्माओ को जो मेरे से निराश हैं शांति से भरपूर हो रही हैं, अगर पता है तो उन्हे ईमर्ज करो। आप के ये संकल्प उन आत्माओ को पहुचेंगें और उन्हे शांति मिलेगी और वह जीवन में उन्नति करेगें।

किन्हीं विशेष आत्माओं या किसी वर्ग या किसी व्यक्ति की सेवा करना चाहते हैं तो उनका चित्र अपनी कल्पना में देखो। उस चित्र को अच्छी अच्छी तरंगे दो यह उस व्यक्ति को पहुंच जायेंगी।

हम किसी को सम्पर्क करना चाहते हैं तो उस का मोबाइल नम्बर डायल करते हैं। हमारा मोबाइल उस व्यक्ति को चाहे वह विश्व के किसी भी कोने में हो उसे ढूंढ लेता है। किसी व्यक्ति की स्थूल शक्ल या उसका चित्र एक अदूतीय मोबाइल नम्बर है। सारे संसार में एक मोबाइल नम्बर के दो सिम नहीं हो सकते। ऐसे एक शक्ल के दो व्यक्ति नहीं हो सकते। जब किसी व्यक्ति के फोटो को देख कुछ सोचते हैं तो हमारे ये विचार उस व्यक्ति को चाहे वह ब्रह्मांड में कहीं भी हो उस तक पहुंच जाते हैं।

एक जगह बैठ कर रडार से उस क्षेत्र की रक्षा कर सकते हैं। ऐसे ही मन रूपी रडार से सारे विश्व की आत्माओं की एक स्थान पर रहते हुये मानसिक विकारों से सुरक्षा कर सकते हैं।

मन ईश्वर की अद्भुत देन है। ये भूतकाल में किसी व्यक्ति ने हमें १० साल पहले थपड मारा था, ये सोचते ही हमारा मन वहां चला जाता है। वही सब कुछ दिखने लगता है, वही घटित होने लगता है, वही सब कुछ अनुभव होने लगता है, जो उस समय हुआ था। ऐसा इस लिये होता है क्यों कि भूतकाल कहीं दूर ब्रह्मांड में चला गया है और हमारे सोचते ही मन वहां पहुंच जाता है।

अगर हम सोचें जब मैं पांच साल का था उस दिन मेरे जन्म दिन पर क्या हुआ था, तो सोचते ही हमारा मन वहां पहुंच जायेगा और वही

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

गुरुजी : बंड्या, सांग पाहू, गोट्या खेळण्याचे काय फायदे आहेत?
बंड्या : गुरुजी, त्यामुळे एकाग्रता वाढते! गुरुजी: ते कसं काय?
बंड्या : कारण एक गोट्या मारताना दुसऱ्याचं लक्ष फक्त आपल्या गोट्यांवर असतं की कोणी चोरून तर नेत नाही ना!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* १२ जून १९०५ रोजी महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील फर्ग्यूसन हिल येथे भारत सेवक समाजाची स्थापना कोणी केली? – गो. कृ. गोखले

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### शितपेये

काही कंपन्यांनी अशी रसायने काढून टाकलेली इन्स्टंट कॉफी बनविली आहे; परंतु ही कॅफिन काढून टाकलेली कॉफी जास्तच हानिकारक ठरते. कारण कॅफिन काढून टाकण्यासाठी जी रासायनिक विद्राव्ये वापरली जातात ती आरोग्यास जास्तच अपायकारक असतात. त्यामुळे कोणत्याही जाहिरातींना बळी पडू नये, क्वचित प्रसंगी थंडीपासून रक्षण करण्यासाठी एक बदल म्हणून अर्धा कप कॉफी प्यावी. त्यामुळे नक्कीच उत्साह वाढून ताजेपणा वाटेल, पण कॉफीचे रोजच वारंवार जास्त प्रमाणात सेवन केल्यास अस्वस्थपणा वाढून मानसिक ताण वाढतो. कॅफिन हे एक प्रकारचे विषच आहे, त्यामुळे कॉफीचे सेवन टाळावे.

पर्यायी पदार्थ :

काही लोक चहापेक्षा कॉफी पिणे प्रतिष्ठेचे मानतात. परंतु असे मानणे हे केवळ अज्ञानामुळे असते. चहा व कॉफी हे दोन्ही पेये टाळून उत्साह निर्माण होण्यासाठी नैसर्गिक आरोग्यपूर्ण पेय प्यावे.

कृती : ७-८ तुळशीची पाने, ४-५ पुदिना पाने, अर्धा इंच आले, अर्धा चमचा आवळा पावडर, २ चमचे लाल गूळ व दीड कप पाणी हे सर्व मिश्रण एक कप पाणी राहीपर्यंत उकळावे व नंतर हे पेय गाळून प्यावे. ही सर्व घटकद्रव्ये नैसर्गिक असल्यामुळे त्यांच्यामधील पोषणमूल्यद्रव्ये भरपूर प्रमाणात शरीरास मिळतात व त्यामुळे नक्कीच आरोग्य सुधारते. त्याचबरोबर हळद, ओवा, वेलची, शतावरीकल्प टाकून दूध पिणेसुद्धा आरोग्यास उत्तम आहे. शीतपेये - शहरी भागामध्ये थम्सअप, लिम्का, कोकाकोला, माझा, सोडा, पेप्सी, मिरिंडा अशा प्रकारची शीतपेये पिण्याचे प्रमाण सध्याच्या काळात वाढलेले आहे. तत्काल ऊर्जा मिळविण्यासाठी व तहान भागविण्यासाठी या शीतपेयांचा नक्कीच उपयोग होतो; पण त्याचबरोबर वारंवार जर यांचा जास्त प्रमाणात वापर केला, तर त्यांचे शरीरावर दुष्परिणाम होतात. म्हणून क्वचितच यांचा वापर करावा.

औषधी गुणधर्म : यामध्ये शरीराचे पोषण होईल अशी पोषणमूलद्रव्ये व औषधी गुणधर्म फारसे नसतातच. उपयोग :

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये तहान भागविण्यासाठी कधीतरी तृष्णाशामक म्हणून पेयांचा उपयोग होतो. २. प्रवासामध्ये तहान लागल्यानंतर स्वच्छ पाणी पिण्यास उपलब्ध नसेल, तर अशा वेळी तहान शमविण्यासाठी यांचा उपयोग होतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# वेद मंत्राच्या प्रभावी सामर्थ्याने भारत उन्नथावस्थेच्या टप्प्यावर

### श्री नरसिंह आश्रम स्वामी महाराज यांचे प्रतिपादन


शुक्ल यजुर्वेद माध्यंदिन शाखेचे दण्डक्रम पारायण यशस्वी करून मायभूमी नगरमध्ये आलेल्या वेदमूर्ती देवव्रत महेश रेखे यांचा सत्कार करण्यात आला.

नगर – भारत देश उन्नथावस्थेच्या टप्प्यावर आला आहे. सनातन वैदिक धर्मासाठी, सर्व वर्णियांसाठी, सर्व स्त्रियांसाठी ही आनंदाची घटना असून यामधून सर्वांचे कल्याण होणार आहे. वेद मंत्राच्या सामर्थ्याचा हा प्रभावी परिणाम आहे, असे प्रतिपादन पुणे येथील श्रीमद् जगद्गुरू शंकराचार्य मठाचे मठाधिपती श्री नरसिंह आश्रम स्वामी महाराज यांनी केले.

शुक्ल यजुर्वेद माध्यंदिन शाखेचे दण्डक्रम पारायण यशस्वी करून मायभूमी नगरमध्ये आलेल्या वेदमूर्ती देवव्रत महेश रेखे यांच्या जाहिर सत्कार समारंभात येथील गायत्री मंदिर सभागृहात ते बोलत होते. समारंभाअगोदर मोठ्या थाटात शोभायात्रा काढण्यात आली होती. ही शोभायात्रा अर्बन बॅंक रोड, भिंगारवाला चौक, कापड बाजार, तेलीखुंट, चितळेरोड, नेता सुभाष चौक, नवीपेठ मार्गे महाजन गल्लीतील गायत्री मंदिर प्रांगणात आली. ठिकठिकाणी रथ थांबवून पुष्पवृष्टी करत औक्षण करण्यात आले. वेदमंत्रांच्या घोषात उत्साहपूर्ण वातावरणात गायत्री मंदिरात वेदोनारायणांचे स्वागत झाले.

सनातन धर्मसभेचे स्वागताध्यक्ष वेदमूर्ती श्री. दत्तोपंत पाठक गुरूजी यांनी सर्वांचे स्वागत केले.

धर्मसभेचे उपाध्यक्ष निळकंठ देशमुख यांनी प्रास्तविक करताना धर्मसभा शतक रौप्य महोत्सवाच्या उंबरठ्यावर उभी असल्याची माहिती देऊन अकरावे अध्यक्ष वेदमूर्ती महेश रेखे झाले, असे सांगितले. १९०३ साली स्वामी प्रकाशानंदांनी गायत्री पुरश्चरण केले अन् गायत्री मंदिराची मुहूर्तमेढ रोवली. वेदमूर्ती देवव्रत रेखे हे देवांना भेटायला जाण्यासाठी व्रत कसे करावे? याचा कृतीशील संदेश देतात, असे ते म्हणाले.

श्रीशंकराचार्यांचे पाद्यपूजन राजाभाऊ व सौ.अलका अमरापूरकर आणि मिलिंद व सौ.माधवी ऋषी यांनी केले. विवेकशास्त्री गोडबोले यांचे पूजन उमेश व सौ. संजीवनी नगरकर यांच्या हस्ते करण्यात आले.

धर्मसभेतर्फे देवव्रत रेखे यांना महावस्त्र, वेदोनारायण पगडी, पुष्पहार, चांदीचे सन्मानपत्र आणि श्रीफळ देवून सन्मानित करताना आरतीही करण्यात आली. प्रा.सौ.भावना वैकर यांनी मानपत्र वाचन केले.

वेदमूर्ती विवेकशास्त्री गोडबोले यांनी मंत्र पाठाची आभरण जसजशी वाढवली जातात तसतशी मंत्राची पॉवर वाढत जाते. सद् गुरू मंत्र देताना पॉवर वाढवण्यास सांगतात. मंत्र आभरणाने मंत्र शक्ती जशी वाढते तसे वाणीतील सामर्थ्य तपाने येते. वेदमंत्र अणू–परमाणू पर्यंत अगदी सूक्ष्मात जाऊन परिणाम साधतात. उलट चालण्याने ब्लड प्रेशर कमी होते. देवव्रतने उलटे पळण्याचा विक्रम केला. दंडक्रमाने शरिर ज्ञानमय होते. वैदिक हिंदूंचा सूवर्णकाळ येणार त्याची ही नांदी आहे.

असुरांना यज्ञयाग आवडत नव्हते. त्यांचे राज्य संपले. आता भारतात यज्ञयाग सुरू आहेत. वेदपाठशाळा वाढत आहेत. ऋषीमुनींनी आपापल्या स्थानी सुरू ठेवलेल्या कार्यामुळेच देवव्रतसारखे परिस भारतभूमीत तयार होऊ लागले आहेत. भारतभूमी पूर्वीसारखी सुवर्णमय होणार आहे. आपण दररोज घराघरात वंदेमातरम् म्हणून भारतभूमी ज्ञानमय–तपोमय करण्यासाठी भगवंताकडे मागणे मागू या, असे ते म्हणाले.

वेदमूर्ती देवव्रत रेखे यांच्या मुखामधून दंडक्रम पारायणातील मंत्र पठण ऐकताना उपस्थितांनी जीवाचा कान केला होता. टाळ्यांच्या कडकडाटाने सभागृहासह परिसर निनादून गेला.

पारायणाचे समिक्षक वेदमूर्ती देवेंद्र गढीकर यांनी आपल्या शहराचे नाव मोठं करण्याचे काम देवव्रतने केले आहे. देवव्रतचे वडिल महेश रेखे हे सनातन धर्मसभेचे ११ वे अध्यक्ष आहेत. अकरा ही रूद्राची संख्या लक्षात घेता धर्मसभेची प्रगती होणार हे निश्चित, असे सांगितले.

विश्व हिंदू परिषदेचे जिल्हाध्यक्ष आशुतोष लांडगे, जिल्हा धर्माचार्य संपर्क प्रमुख हभप मिलिंद महाराज चवंडके आणि जिल्हा धार्मिक यात्रा संघ प्रमुख राजेंद्र चुंबळकर यांनी श्रीशंकराचार्य, वेदमूर्ती देवव्रत रेखे आणि वेदमूर्ती विवेकशास्त्री गोडबोले यांना सोवळे व श्रीफळ देवून गौरविले. गायत्री परिवार, सुमित वर्मा, श्रीनारायण महाराज देवस्थान अर्धपिंपरी (जि. बीड)चे अध्यक्ष भगवान देशपांडे, श्रीदत्त देवस्थान यांनी तसेच भाविकांनी अनेकांनी देवव्रतचे सत्कार वैयक्तीकही केले.

कार्यक्रमास धर्मसभेचे अध्यक्ष वेदमूर्ती महेश रेखे, वेदमूर्ती निलेश केदार, धर्मसभेचे मंत्री रमेश देशपांडे, दिनकर देशमुख, निलेश धर्माधिकारी, सोमनाथ मुळे, समीर उपाध्ये, नंदकिशोर मुळे, निळकंठ अमरापुरकर, उमेश वाळुंजकर, बंडोपंत धर्माधिकारी, गिरीश मुळे, अभिजीत ऋषी, उदय वैकर, मोरेश्वर मुळे, चारुदत्त मुळे, ज्येष्ठ संचालिका प्रभाताई मुळे, राजेद्र नगरकर, पुष्कर तांबोळी, अनंत देशपांडे, दयानंद रेखी, सदानंद कुलकर्णी, मकरंद खरवंडीकर उपस्थित होते. सौ. विणा दिघे यांनी सूत्रसंचलन केले. धर्मसभेचे खजिनदार उमेश नगरकर यांनी आभार मानले. सौ.माधवी ऋषी यांनी म्हटलेल्या पसायदानाने सोहळ्याची सांगता करण्यात आली. सनातन धर्मसभेने या सोहळ्याची जय्यत तयारी केली होती. गायत्री मंदिराच्या पटांगणात आणि ज्ञानेश्वर सभागृहात एलसीडी स्क्रीन लावल्याने उपस्थित सर्वांना हा सोहळा जवळून पहाण्याचा आनंद घेता आला. उत्कृष्ट नियोजनाबद्दल सनातन धर्मसभेचे भरभरून कौतुक करण्यात आले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## अध्यात्म आणि नैतिकता

"मुसाफिर"
वाचनीय मननीय
प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी
चैतन्य पालवी
डॉ.रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित
ललित चिंतन

नैतिकतेच्या अंगाने मानवी जीवनाला घडविणारे परिवर्तन अध्यात्माला अभिप्रेत आहे. नुकतीच या संदर्भातील एक बोधकथा वाचण्यात आली. एका चित्रकाराने एक अजरामर चित्रकृती तयार करण्याचा संकल्प केला व कंस देवकीच्या निरागस बाळाला आपटून मारीत असल्याचे चित्र काढावे असे ठरविले. कंसाचे क्रौर्य पाहून पाशवी वृत्तीबद्दल लोकांच्यात निर्माण होईल घृणा तर बाळाचा निरागस चेहरा पाहून त्याच्याविषयी सौजन्य उभे राहील. त्याने निरागस बाळाचा चेहरा टिपण्यासाठी बरीच भ्रमंती केली.

शेवटी एका झोपडीच्या दारापाशी झोळीत झोपलेले एक निरागस बाळ त्याने पाहिले. त्याचे वडील दारू पिऊन त्याच्या आईला मारत होते आणि रडून रडून अगतिकपणे बाळ झोपले होते. मुलाचा चेहरा मिळाला. आता कंसाचे काय? खूप भ्रमंती केली पण कंसासारखा क्रूर चेहरा सापडेना. शेवटी नाद सोडून दिला. चांगली वीस–पंचवीस वर्षे लोटली.

एका कारागृहात कंसासारखा क्रूर माणूस दिसला. त्याने अनेकांचे खून केले होते. अनेकांची अब्रू लुटली होती. अनेकांना अकारण मारले होते. कारागृहप्रमुखाची परवानगी घेऊन त्याने त्याचा चेहरा कागदावर रेखाटला. त्या गुन्हेगाराने ते चित्र पाहण्याची इच्छा व्यक्त केली आणि चित्र पाहता पाहता तो ओक्साबोक्शी रडू लागला. इतका निगरगट्ट माणूस रडतो आहे याचे जेलरसह सर्वांना आश्चर्य वाटले. त्या चित्रकाराने त्याला विचारले, 'तू का रडतोस?' त्यावर तो म्हणाला, 'खरं सांगू? त्या चित्रातलं बाळही मीच आहे आणि नंतरचा कंसही मीच. कदाचित त्या झोळीतल्या बाळाला त्या वेळी योग्य दिशा मिळाली असती तर ते बाळ आज कंस झाले नसते. '

'मी दुष्कृत्य करतोय' हे मला कुणी सांगितलं नव्हतं. या चित्राने आज मला माझी खरी ओळख झाली. माणसाला स्वतःची ओळख करून देऊन त्याने स्वतःचेच दोष शोधायचे आहेत. दोष लक्षात आल्यावर आपोआप सद्गुणांच्या दिशेने वाटचाल सुरू होईल आणि परिवर्तन घडेल. थोडक्यात सांगायचे तर जीवनशुद्धी आणि जीवनसिद्धी देणारा मार्ग नैतिकतेनेच दाखविला जातो. सद्गुणी आणि सदाचारी मानवी जीवनाइतकी सुंदरता जगात दुसरी कोणतीही नाही आणि ही सुंदरता नैतिकतेने मिळवायची आहे. भक्तीने मोक्ष मिळवावा की सदाचारी जीवन जगावे या वादात न पडता संतांनी भक्तिला सदाचाराची जोड दिली. ज्ञानेश्वर माउली म्हणतात,

जया भक्तीची येतुली प्राप्ती!
ते कैवल्याते परौते म्हणती !
जयाचिये लीलेमाजी निती ।
जियाली असे ।।

जे भक्तिच्या ब्रह्मानंदात निमग्न झाले आहेत ते देखील मोक्षाला 'पलीकडे हो' असे म्हणत.

**– किशोर गांधी**

# महानगरपालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे राष्ट्रीय युवा दिन उत्साहात साजरा

### बुथ हॉस्पिटल व जिजामाता नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा सहभाग; विद्यार्थ्यांनी रेखाटले प्रेरणादायी युवा संकल्पाचे पोस्टर


मनपा कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे राष्ट्रीय युवा दिन साजरा झाला. (छाया – लहू दळवी)

नगर – स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी १२ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय युवा दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. युवक हे राष्ट्राचे बळ आहेत या विचाराची साक्ष देत मनपा कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे यंदा राष्ट्रीय युवा दिन उत्साह, प्रेरणा व सामाजिक संदेश देणाऱ्या वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन बुथ हॉस्पिटल नर्सिंग कॉलेज व जिजामाता नर्सिंग कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

स्वामी विवेकानंद यांच्या विचारांमधून तरुणांना प्रेरणा मिळते. त्यांचे आदर्श जीवन, त्यांची अध्यात्मिक विचारधारा व राष्ट्रप्रेम यामुळे आजही युवकांना दिशा मिळते. भारत हा जगातील सर्वात युवा देश असून, माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी सांगितल्याप्रमाणे, युवकांच्या सामर्थ्यावर भारत २१ व्या शतकात महासत्ता बनेल. हे स्वप्न साकार करण्यासाठी युवकांना योग्य दिशा, योग्य मार्गदर्शन व सुदृढ जीवनशैली आवश्यक आहे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत बुथ हॉस्पिटल नर्सिंग कॉलेज व जिजामाता नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी समाजामध्ये जनजागृती निर्माण करणारी, व्यसनमुक्ती, शारीरिक सुदृढता, मानसिक स्वास्थ्य आणि राष्ट्रनिर्मितीमध्ये युवाशक्तीचे योगदान या विषयांवर आधारित प्रेरणादायी पोस्टर साकारले. विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या या पोस्टरमध्ये सुदृढ युवक – सशक्त भारत, व्यसनमुक्त तरुण – उज्वल भविष्य, युवाशक्ती म्हणजे परिवर्तनाची चळवळ अशा घोषवाक्यांद्वारे प्रभावी संदेश दिले. या माध्यमातून समाजात सकारात्मक ऊर्जेचा संचार झाला.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दीपमाला चव्हाण उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, युवाशक्ती ही उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य आहे. तरुणांनी समाजातील वाईट प्रवृत्तींपासून दूर राहून व्यायाम, अध्ययन, संस्कार आणि सेवा यांचा अवलंब करावा. या मार्गानेच सशक्त आणि आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार होईल.

कार्यक्रमास मल्लिका साबळे, प्रवीण साबळे, तसेच दवाखान्याचे अधिकारी, डॉक्टर, नर्सिंग कॉलेजचे शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते. चित्रकला स्पर्धेनंतर विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचा विशेष गौरव मनपा कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याच्या वतीने करण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व पारितोषिके देऊन त्यांच्या कलात्मकतेचा सन्मान करण्यात आला. या निमित्ताने पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना उज्ज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी स्वामी विवेकानंदांच्या विचारांवर चालत सशक्त भारत घडवूया असा संकल्प केला. तरुणांच्या उमेदीने, समाजसेवेच्या भावनेने आणि सर्जनशीलतेने साकारलेला हा कार्यक्रम मनामनात उत्साह आणि प्रेरणा निर्माण करणारा ठरला.


माऊंट लिटेरा झी स्कूल येथे मकर संक्रांत उत्साहात साजरी करण्यात आली.

# माऊंट लिटेरा झी स्कूल येथे मकर संक्रांत उत्साहात

नगर – माऊंट लिटेरा झी स्कूल, अहिल्यानगर येथे मकर संक्रांत सण साजरा करण्यात आला. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून मकर संक्रांतीचे धार्मिक, सांस्कृतिक व वैज्ञानिक महत्त्व जाणून घेतले. सूर्यदेव मकर राशीत प्रवेश करतो, या खगोलीय घटनेचे प्रतीक म्हणून हा सण साजरा केला जातो. उत्तरायणाच्या प्रारंभाचे प्रतीक असलेली मकर संक्रांत सकारात्मकता, नवचैतन्य व आशेचा संदेश देते.

तिळगूळ वाटपामागील गोडी व आपुलकी जपण्याचा संदेश, पतंग उडवण्यामागील आनंद, उत्साह व मुक्ततेची भावना, तसेच काळ्या हिवाळ्यात शरीरास उष्णता देणाऱ्या तिळाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सोप्या शब्दांत समजावून सांगण्यात आले. विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना भारतीय सणांमागील परंपरा व मूल्ये अनुभवता आली.

तिळगूळ घ्या, गोड गोड बोला या संदेशातून आपुलकी, सौहार्द व सामाजिक ऐक्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी संचालिका स्वाती कानडे, प्राचार्या स्मिता चव्हाण व प्रीस्कूल समन्वयक पायल घोडके यांनी विद्यार्थ्यांना मकर संक्रांतीच्या शुभेच्छा देत भारतीय सणांमधून जीवनमूल्ये, संस्कार व सकारात्मक दृष्टिकोन घडतो, असे प्रतिपादन केले. शिक्षकवर्गाच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# अनामप्रेमच्या कलाकारांनी निसर्गप्रेमींना केले मंत्रमुग्ध

### ट्रेकॅम्पच्या पुढाकारातून दिव्यांगांनी घेतला गर्भगिरी डोंगर परिसरात ट्रेकचा आनंद


ट्रेकॅम्पच्या पुढाकारातून दिव्यांगांनी घेतला गर्भगिरी डोंगर परिसरात ट्रेकचा आनंद घेतला.

नगर – पहाटेची वेळ... निसर्गरम्य डोंगर परिसर... हवेत गारवा आणि कानात पडणारा वाद्यांचा निनाद अन सुमधूर भजनांचा आवाज... त्यामुळे तृप्त झालेले रसिक पर्यटनप्रेमी... निमित्त होते ट्रेकॅम्पने अनामप्रेम संस्थेच्या दृष्टीहिन विद्यार्थ्यांसह आयोजित केलेल्या गर्भगिरी महादेव मंदिर परिसरातील ट्रेकचे. अनामप्रेमच्या कलाकारांनी रंगवलेल्या संगीत मैफलीत उपस्थित अक्षरशः मंत्रमुग्ध झाले होते.

गर्भगिरी डोंगररांगेत नगरपासून सुमारे २० किलोमीटर अंतरावर गर्भगिरीचा महादेव हे पुरातन छोटेसे दगडी मंदीर आहे. ट्रेकॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी यांच्या संकल्पनेतून या वेळी या मंदिर परिसरातील टेकडीवर ट्रेकचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, यंदाच्या ट्रेकचे वेगळे वैशिष्ट्य होते. अंधांसाठी काम करणाऱ्या अनामप्रेम संस्थेच्या ३० दृष्टीहिन विद्यार्थ्यांना सोबत घेण्यात आले होते. भल्या पहाटे २५० निसर्गप्रेमी नगरकर व अनामप्रेमचे ३० विद्यार्थी चांदबिबी महाल घाटात पोहोचले. डोंगरावरील सपाट जागेवर सर्वांनी शारीरिक कसरती केल्या. एक वेगळीच अनुभूती मिळालेल्या अनामप्रेमच्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर कमालीचा आनंद दिसत होतो. त्यानंतर ट्रेक घडवून आणण्याचे आव्हान ट्रेकॅम्पच्या सदस्यांवर होते. ते त्यांनी व्यवस्थित पार पाडले.

गर्भगिरीच्या महादेव मंदिर परिसरात पोहोचल्यानंतर सर्वांनी मनोभावे दर्शन घेतले. नंतर अनामप्रेमच्या सौदागर लोंढे, द्वारका जोरावर, श्रद्धा काटे, राधा यादव, काजल असवले, अमर सोमवंशी, प्रकाश धुंदकर, राहुल पेटारे आदी वादक–गायकांनी डॉ. मेघना मराठे, अभय रायकवाड, सुरेखा राठोड, अमृत भुसारी, राहुल खिरोडे यांच्या मार्गदर्शनाखाली मैफल चांगलीच रंगवली. त्यांनी तबला, पेटी, खंजिरी, चायना ब्लॉक, टाळ या वाद्यांच्या साथीने सुमधूर भजने सादर केली. या कलाविष्काराने मंत्रमुग्ध झालेल्या रसिकांनी टाळ्यांच्या गजरात त्याचे स्वागत केले. राहुल पेटारे या विद्यार्थ्याने एका हाताने टाळी वाजवून दाखविली. त्यामुळे उपस्थित सर्वचजण अचंबित झाले. राजू भगत यांनी संस्थेची माहिती दिली. अनामप्रेमच्या विद्यार्थिनींचे हेअर कट मोफत करून देण्याची इच्छा ट्रेकॅम्पच्या सदस्या शितल दळवी यांनी या वेळी व्यक्त केली.

स्वादिष्ट भेळ आणि गरम कॉफीचा आस्वाद घेतल्यानंतर या विद्यार्थ्यांना व्यवस्थित गाडीपर्यंत सोडण्यात आले. या दिव्यांगांना ट्रेक घडवून आणल्याचे समाधान अनेक ट्रेकरच्या चेहर्यावर होते, तर काहीजणांच्या डोळ्यात सहानुभूतीचे अश्रू होते. एका वेगळ्या ट्रेकचा अनुभव सर्वांनी घेतला.

ट्रेकर बनले 'त्यांचे' डोळे... ट्रेकला आलेल्या अनामप्रेमच्या प्रत्येक विद्यार्थ्याची जबाबदारी एका–एका ट्रेकरने घेतली. त्यांना व्यवस्थित हाताला धरून डोंगरावरील भटकंती सुरू झाली. आपल्या आजूबाजूला डोंगर आहे, एकीकडे दरी आहे, पवनचक्की आहे, गवत वाळलेले आहे असे विविध वर्णन विद्यार्थ्यांना ऐकवले जात होते. जणू ट्रेकर त्या विद्यार्थ्यांचे डोळेच बनले होते. त्यामुळे निसर्गाचा परिपूर्ण आनंद या विद्यार्थ्यांनी घेतला.

# गुरुकुल कॅम्पसमध्ये हिवाळी क्रीडा स्पर्धा उत्साहात


गुरुकुल कॅम्पसमधील हिवाळी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करताना पोलीस मुख्यालयाचे पोनि. उमेश परदेशी.

नगर – गुरुकुल कॅम्पसमधील डॉ. पी.ए. इनामदार प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूल, महाराष्ट्र कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय संयुक्त हिवाळी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन पोलीस मुख्यालयाचे पोलीस निरीक्षक उमेश परदेशी यांच्या हस्ते पार पडले. या उद्घाटन कार्यक्रमास प्रमुख पाहुणे पोलीस कॉन्स्टेबल शेख राहील, ग्राउंड इन्स्ट्रक्टर मंगेश दाभाडे उपस्थित होते. तसेच संस्थेचे अध्यक्ष एन.ए. पठाण, शाळा समितीचे चेअरमन अनिल साळुंके, संस्थेचे समीर पठाण, देविदास डहाळे, लक्ष्मीकांत गरड, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कुंदा झोंड, गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूलच्या प्राचार्या दीप्ती कराळे, कॉलेजचे प्राचार्य शुभम टेमकर उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष पोलीस निरीक्षक उमेश परदेशी व पाहुण्यांच्या हस्ते क्रीडा विभागाचे ध्वजारोहण करण्यात आले. तसेच क्रीडा ज्योत प्रज्वलित करून व हवेत कबुतर सोडून क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी त्याचप्रमाणे बॅण्ड पथकाने ध्वजास व पाहुण्यांना सलामी दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी क्रीडा शपथ घेतली तसेच विद्यार्थ्यांनी झांज पथकाचे सादरीकरण करण्यात आले.

शाला समितीचे चेअरमन अनिल साळुंके यांनी आपल्या भाषणात स्पोर्ट्स शब्दांची व्याख्या सांगून खेळाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

अध्यक्षीय भाषणात परदेशी यांनी विद्यार्थ्यांना खेळामुळे केवळ शारीरिक विकास होत नाही तर संघभावना आणि शिस्तही जोपासली जाते. खेळाडूंनी हार–जितीचा विचार न करता निकोप खेळ भावनेने स्पर्धेत उतरावे व आपल्या जिल्ह्यातील खेळाडूंनी जसे जागतिक पातळीवर नाव कमाविले तसेच विद्यार्थ्यांनी कमवावे, असा संदेश देण्यात आला.

विद्यालयातील विद्यार्थिनी शेख अलिना इरफान या विद्यार्थिनीने धावणे स्पर्धेत विभागीय पातळीवर यश संपादन केले, त्यानिमित्त सत्कार करण्यात आला.

राहील शेख यांनी खेळाडूंना शुभेच्छा देताना विद्यार्थ्यांनी खेळात करियर करावे व खेळाडूंना खेळातून योग्य व्यासपीठ मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन केले.

सूत्रसंचालन शितल कडूस यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिंदे शिल्पा, बोरुडे प्रियंका, शेख सबा, गवारे अभिजीत, निमसे अमोल, शेख सबिहा, शेख सानिया, बोरुडे अक्षय, झरेकर पुजा, मोहिते योगिता, शेळके सविता, कोरी ममता, चौधरी राधा, कर्डिले वैशाली, शेख सना, राहणे शितल, शेख सना सुलतान, कुमावत अनिता, गुलअफरोज सय्यद, सीजी विश्वनाथन, विद्या स्वामी, सरोज धाडीवाल, शेख फातिमा, सलमान पठाण, आसिफ पठाण, विमल पोतखुले, ज्योती मुर्तडकर यांनी परिश्रम घेतले.

# नगरमध्ये १९ जानेवारीला मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, 'नेत्र, दंत आणि आरोग्य तपासणी, औषधे वाटप शिबीर'



नगर – एकदंत गणेश मंदिरतर्फे १९ जानेवारी रोजी स. १० ते दु.३ या वेळेत दातरंगे मळा, एकदंत कॉलनी, अ.नगर येथे मोफत नेत्र,दंत व आरोग्य तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया व औषधे वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले.

आज संगणक, टीव्ही व प्रदुषणमुळे डोळ्यांवर व आरोग्यावर दुष्परिणाम होऊ लागले आहेत. काही शहरी व ग्रामीण भागात डोळ्यांची व आरोग्याची निगा राखण्यामध्ये जनतेचे दुर्लक्ष होत चालले आहे. त्यातच मोतीबिंदू सारख्या सुमारे १५ ते २० हजार रुपयांच्या शस्त्रक्रिया सामान्यांच्या आवाक्याबाहेरच्या असतात. म्हणून आम्ही हे शिबीर आयोजित केले आहे.

एच.व्ही.देसाई नेत्र रुग्णालय,पुणे यांच्या सहकार्याने हे शिबीर होणार आहे. नेत्रतपासणीपासून ते मोतीबिंदू पर्यंतचे सर्व सोपस्कार मोफत करण्यात येणार आहेत. यामध्ये रुग्णांचा नगर ते पुणे प्रवास, भोजन, निवास व काळा चष्मा आदि बाबींचा समावेश आहे, शस्त्रक्रियेसाठी निवडण्यात आलेल्या रुग्णांवर पुण्यात मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. तसेच मोफत आरोग्य व दंत तपासणी व औषध वाटप शिबीरात तज्ञ डॉ.शाम गुरुड, डॉ.प्रशांत सुरकुटला, डॉ.रत्ना बल्लाळ, डॉ.योगेश मंचे, डॉ.प्रतिक्षा कोडम हे डॉक्टर रुग्णांची तपासणी करुन योग्य ते मार्गदर्शन करुन औषधे वाटप करणार आहेत. रुग्णांनी शिधा पत्रिका झेरॉक्स सोबत आणावी, सध्या चालू असलेले औषध व गोळ्याही बरोबर आणाव्यात.

रुग्णांसाठी नावनोंदणी आवश्यक असून सौ.विनोदा बेत्ती मो.९२७०६८४७४१, सौ. स्वाती गाजेंगी मो.७२७६८८७४८१, ओंकार बुरगुल मो.८६०५१६७७६८, यश मंचे मो. ८४८५८४७६६०, एच.व्ही.देसाई रुग्णालयाचे शुभम बोज्ञा मो.९०२८४४०४०४ यांच्याशी संपर्क साधावा.

या मोफत तपासणी शिबीराचा व शस्त्रक्रियेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनी केले आहे.


धूत फाउंडेशन व रोटरी क्लब अहमदनगर प्रियदर्शनी यांनी तांदळी वडगाव या छोट्याशा गावातील प्राथमिक शाळेच्या प्रांगणात पेव्हिंग ब्लॉक बसवून दिले.

# ‘रोटरी’ व ‘धूत’तर्फे धर्मनाथ विद्यालय प्राथमिक शाळेच्या प्रांगणात पेव्हिंग ब्लॉक

नगर – रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनी यांच्या समाजसेवेच्या व्रताला जोड मिळाली ती श्रीगोपाल रामनाथ धूत फाउंडेशन यांच्या दातृत्वाची आणि त्यातूनच मदत मिळाली धर्मनाथ विद्यालय तांदळी वडगाव या प्राथमिक शाळेला. धूत फाउंडेशनच्या सीएसआर फंडातून करावयाच्या सेवाकार्याचा एक भाग म्हणून धूत फाउंडेशन व रोटरी क्लब अहमदनगर प्रियदर्शनी यांनी संयुक्तपणे नुकतेच अहिल्यानगर जिल्ह्यातील तांदळी वडगाव या छोट्याशा गावातील प्राथमिक शाळेच्या प्रांगणात पेव्हिंग ब्लॉक बसवून दिले. त्यानिमित्त रोटेरियन प्रतिभाताई धूत यांच्या उपस्थितीत धर्मनाथ विद्यालय तांदळी वडगाव या ठिकाणी हा कार्यक्रम झाला.

शाळेचे मुख्याध्यापक यांनी पाहुण्यांचे स्वागत करताना धूत फाउंडेशन व रोटरी प्रियदर्शनीने तांदळी वडगावच्या धर्मनाथ विद्यालयाला नेहमीच मदत केली आहे असे सांगून कृतज्ञता व्यक्त केली.

दीपप्रज्वलनाने या कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यावेळी आपल्या मनोगतात कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रेसिडेंट रोटेरियन अनुराधा आठरे म्हणाल्या शैक्षणिक संस्थांना त्यांच्या गरजेनुसार मदत करण्यास रोटरी क्लबचा नेहमीच पुढाकार असतो. शालेय शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा मिळाव्यात असा नेहमी रोटरी प्रियदर्शनीचा प्रयत्न असतो. त्यानुसार या शाळेची गरज ओळखून शाळेच्या प्रांगणात धूत फाउंडेशन च्या मदतीने आम्ही ब्लॉक्स बसवून दिले. अशा कार्यासाठी धूत फाउंडेशन आम्हाला नेहमी मदत करत असते.

धूत फाउंडेशनच्या प्रतिनिधी रोटेरियन प्रतिभाताई धूत यांचे त्यांनी यावेळी आभार मानले.

सेक्रेटरी रोटेरियन अश्लेषा भंडारकर यांनी मुलांना मार्गदर्शन केले. भविष्यकाळात तुम्ही मुलांनी इतके सक्षम व्हावे की तुम्ही तुमच्या या शाळेला व इतरही ठिकाणी काही मदत करु शकाल.

रोटेरियन सविता काळे यांनी धर्मनाथ विद्यालय व रोटरी प्रियदर्शनी यांचा दुवा साधणाऱ्या ठोंबरे सरांचा गौरव केला.

रोटेरियन प्रतिभाताई धूत यांनी शाळेसाठी काही मदत लागल्यास आम्ही ते पुरवू असे आश्वासन यावेळी दिले.

शाळेतील शिक्षिका यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

यावेळी रोटेरियन प्रतिभाताई धूत, प्रेसिडेंट अनुराधा आठरे, सेक्रेटरी अश्लेषा भंडारकर, रोटेरियन आशाताई फिरोदिया, रोटेरियन ज्योती गांधी, रोटेरियन देविका रेळे, रोटेरियन विभा तांबडे, रोटेरियन सविता काळे, रोटेरियन रजनी भंडारी व मीनल काळे उपस्थित होते. तसेच धर्मनाथ विद्यालयातील शिक्षक वृंद कर्मचारी व संस्थेचे सभासद उपस्थित होते.

# राजस्थानी मंडळाच्या हळदीकुंकू कार्यक्रमाला महिलांचा प्रतिसाद

नगर – संक्रांतीनिमित्त राजस्थानी महिला मंडळाच्या वतीने शहरातील महेश मंगल कार्यालयात हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला समाजातील २०० पेक्षा अधिक महिलांनी उपस्थिती लावून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.


राजस्थानी महिला मंडळाच्या वतीने आयोजित हळदीकुंकू कार्यक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाची सुरुवात मंडळाच्या अध्यक्षा शोभा राठी, सचिव शारदा लड्डा, स्नेहलता सोमानी, आशा सोनी, अलका बलदवा, सुवर्णा नागोरी, इंदिरा बिहाणी, निर्मला बंग, स्मिता सारडा, सरस्वती झंवर, पुष्पा मणियार तसेच प्रमुख अतिथी सुनंदा सोमानी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली.

कार्यक्रमात ‘कुटुंबाचा पाया भक्कम कसा करावा’ या विषयावर हेमा सारडा यांनी केलेले मार्गदर्शन उपस्थित महिलांनी मंत्रमुग्ध होऊन ऐकले. यावेळी प्रमुख अतिथी सुनंदा सोमानी यांनी गीता परिवाराबाबत माहिती देत समाजकार्य करण्यास इच्छुक महिलांचे गीता परिवारात कार्यकर्ता म्हणून नेहमीच स्वागत असल्याचे सांगितले.

वैष्णवी भजन मंडळाच्या शोभा लड्डा, महिलांच्या व्यवसायाला व्यासपीठ मिळवून देणाऱ्या उज्वला मालू, प्रयास ग्रुपच्या अलका मुंदडा तसेच तरंग उपक्रमाच्या प्रमुख शामा मंत्री यांचा त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. तसेच मंडळाच्या नवीन कार्यकारिणी सदस्यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. नवीन वर्षात कार्यकारिणीच्या सहकार्याने अनेक उपक्रम राबविण्यात येतील, असा विश्वास अध्यक्षा शोभा राठी व सचिव शारदा लड्डा यांनी व्यक्त केला. सूत्रसंचालन अलका नावंदर यांनी केले.

# मच्छिंद्रनाथ गडावर २० जानेवारीपर्यंत ‘पौष अमावास्या यात्रा उत्सवाचे’ आयोजन

नगर – श्रीक्षेत्र मच्छिंद्रगड (मायंबा) सावरगाव हे नगर–बीड जिल्ह्याच्या सीमेवर आष्टी तालुक्यातील ठिकाण. या ठिकाणी चैतन्य मच्छिंद्रनाथाची जगातील एकमेव अशी संजीवन समाधी आहे. येथे पौष अमावास्येला मोठा यात्रा उत्सव चालतो. यावर्षी हा उत्सव १७ ते २० जानेवारी असा चार दिवसात होत आहे. या भव्यदिव्य उत्सवास उपस्थित राहावे, असे आवाहन नाथ भक्तातर्फे प्रा.अजित इथापे यांनी केले आहे.



देशभरातील लाखो नाथभक्तांचे व अठरापगड जाती धर्माचे श्रद्धास्थान असे मच्छिंद्रनाथ देवस्थान आहे. या गडावर अमावास्येच्या आदल्या दिवशी म्हणजे शनिवारी सकाळी आठ ते अकरा वाजेपर्यंत सावरगाव येथे कोठी मिरवणूक काढून शिधा गोळा करतात. दुपारी तीन नंतर कोठी मिरवणूक गडावर येते. रविवारी गोळा केलेला शिधाचे देव तलाव येथे रोट नैवेद्य तयार करून मिरवणुकीने नाथ संजीवन समाधीस नैवद्य अर्पण करतात. रात्री नाथांच्या घोड्यासमवेत छबीना मिरवणूक होते. सोमवारी दुपारी कुस्त्यांचा जंगी हंगामा होतो व रात्री सांस्कृतिक कार्यक्रम होत असतो, मंगळवारी धर्मनाथ बिजोत्सव यामध्ये अन्नदान, वस्त्रदान होऊन यात्रा उत्सवाची सांगता होते. येथे मंदिराचे जीर्णोधराचे काम प्रगतीपथावर आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने येथे दीर्घकाळ टिकणारे पक्षांची लागवड केलेली आहे. आयुर्वेदिक वनस्पती, गावरान गाईची गोशाळा, प्रेक्षणीय पर्यटन स्थळ होत आहे.

या गडाचे विश्वस्त तथा आमदार सुरेश धस, अध्यक्ष दादासाहेब चितळे, सचिव बाबासाहेब म्हस्के व सर्व विश्वस्त देवस्थान ट्रस्ट मंडळी, ग्रामस्थ, भाविक भक्त स्वतःला झोकून देऊन नाथ सेवेला हजर असतात. या भव्य दिव्य यात्रा उत्सवास भाविकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन नाथभक्तातर्फे प्रा.अजित इथापे यांनी केले.

# राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त केडगावमध्ये वृक्षारोपण

## प्रभाकरम फाऊंडेशनतर्फे देशी, औषधी व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड

नगर – राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त प्रभाकरम फाऊंडेशनच्या वतीने केडगाव परिसरात वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत विविध देशी, औषधी व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण करण्याचा संदेश या उपक्रमाच्या माध्यमातून देण्यात आला.

राजमाता जिजाऊ यांचे विचार समाजात रुजविणे व पर्यावरण रक्षणाची जबाबदारी प्रत्येकाने घेण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. केवळ वृक्षारोपण करून थांबायचे नाही, तर लावलेल्या वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प उपस्थित सर्वांनी यावेळी केला. या कार्यक्रमास प्रभाकरम फाऊंडेशनचे अध्यक्ष विपुल तापकीर, उपाध्यक्ष अभिषेक थोरात, रविंद्र टकले, भाऊ घुले, शिवम थोरात, श्रीकर कुलकर्णी, निखिल बहिरट यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.


राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त प्रभाकरम फाऊंडेशनच्या वतीने केडगाव परिसरात वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला.

नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक करत फाऊंडेशनच्या कार्याला पाठिंबा दर्शविला.

विपुल तापकीर म्हणाले की, राजमाता जिजाऊ यांनी समाज घडवताना मूल्यांची आणि संस्कारांची पायाभरणी केली. त्यांचे विचार आजच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे. निसर्गाशी मैत्री करणे काळाची गरज झाली आहे. वृक्ष म्हणजे केवळ झाड नाही, तर तो जीवनाचा आधार आहे. आज लावलेला प्रत्येक वृक्ष उद्याच्या पिढीसाठी सुरक्षित भविष्य देणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रभाकरम फाऊंडेशन समाजोपयोगी, पर्यावरणपूरक व जनजागृतीचे विविध उपक्रम सातत्याने राबवत असून भविष्यातही असे उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा त्यांनी संकल्प केला.



भिंगारमध्ये शाकंभरी नवरात्र व पौष पौर्णिमा उत्सव भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा झाला.

# भिंगारमध्ये शाकंभरी नवरात्र व पौष पौर्णिमा उत्सव साजरा

## देवांग कोष्टी समाज बांधव व महिला वर्गाचा प्रतिसाद

नगर – भिंगार शहरातील देवांग कोष्टी समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला शाकंभरी नवरात्र व पौष पौर्णिमा उत्सव भक्तिमय, धार्मिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. समाजाच्या धार्मिक परंपरा व सांस्कृतिक वारसा जपणारा या सोहळ्यात समाजबांधव व महिला सहभागी झाल्या होत्या.

या उत्सवानिमित्त भिंगार शहरातून लेझीम, टाळमृदंगाच्या गजरात बाल वारकरी मुलांसह मिरवणूक काढण्यात आली. टाळ–मृदंगाच्या तालावर व गजरात निघालेल्या वारकरी मुलांनी उपस्थितांचे मन जिंकले. या मिरवणुकीत समाजातील ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक आणि बालक सहभागी झाले होते. महिला भजनी मंडळाच्या वतीने श्री गणेशाच्या भक्तिगीताने मिरवणुकीची सुरुवात करण्यात आली. टाळच्या गजरात सादर होणाऱ्या भजनांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. महिलांचा सहभाग व भक्तीभावाने केलेले भजन हे या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले.

या संपूर्ण कार्यक्रमात समाजातील इयत्ता १० वी व १२ वी बोर्डातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच निस्वार्थपणे सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींना समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. या सोहळ्यासाठी अक्षय कर्डिले, हरदिन मॉर्निंग ग्रुपचे अध्यक्ष संजय सपकाळ, महेश झोडगे तसेच मित्र परिवाराने उपस्थित राहून समाजबांधवांना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी भिंगारचे अध्यक्ष शिवम प्रभाकर भंडारी, महिला अध्यक्षा राखी उपरे, विठ्ठलराव लोखंडे, अनिल सोळशे, विजयकुमार भंडारी, संदीप टेके, ज्ञानेश्वर फासे, रमेश बोंदर्डे, उमाकांत आस्मर, गणेश उपरे, किशोर उपरे, दत्ता लोखंडे, गजानन भंडारे, बाळकृष्ण कुमठेकर, नारायण वाघुंबरे, माऊली दिघे, राहुल लिपारे, आशुतोष गलांडे, स्वप्निल कांबळे, दीपक बोंदर्डे, पवन बोंदर्डे, देविदास कुमठेकर, राजू कुरकुटे, प्रवीण खरपे, हर्षद लोखंडे, भाऊ चिनके, दीपक चिनके, जय लोखंडे, बाळू हंपे, सुनील विधाटे, शुभम चिनके, अनिल दिवटे, श्याम दिवटे, अनिल गलांडे, वैभव लिपारे, अलका भंडारी, राजश्री दिवटे, राणी लोखंडे, शितल कांबळे, संगीता गलांडे, रूपाली बाबर, गीता बाबर, भाग्यश्री लोखंडे, अनिता लोखंडे, ज्योती उदबत्ते, अमोल उदबत्ते, ओंकार उदबत्ते, आदित्य दिवटे, योगेश उपरे, रसिका लोखंडे, अनिता सोळसे आदींसह समाजबांधव उपस्थित होते.

शिवम भंडारी म्हणाले की, देवांग कोष्टी समाज हा नेहमीच परंपरा, संस्कृती आणि भक्तीभाव जपणारा समाज आहे. शाकंभरी नवरात्र व पौष पौर्णिमा हे उत्सव केवळ धार्मिक नसून समाजाला एकत्र आणणारे आहेत. आजच्या या मिरवणुकीतून आपली संस्कृती पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. बाल वारकरी, महिला भजनी मंडळ, युवक आणि ज्येष्ठ नागरिक यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहून मनाला समाधान मिळते. समाज एकसंघ राहिला तरच आपण पुढे जाऊ शकतो. धार्मिक उत्सवांसोबत सामाजिक उपक्रम, शिक्षण, आरोग्य आणि युवकांच्या प्रगतीसाठी आपण सर्वांनी एकत्र काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

# ‘बाणेश्वर कला महाविद्यालयामध्ये’ डॉ.बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला

नगर – बाणेश्वर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, बहि:शाल शिक्षण मंडळांतर्गत डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला झाली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून करण्यात आली. प्रा.मयुरी बारवकर यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.



बाणेश्वर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.

या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प संगमनेर येथील डॉ. अनिल देशपांडे यांनी ’असे जगा असे रहा’ या विषयावर गुंफले, माणसाने दृष्टिकोन चांगला ठेवावा, सकारात्मक भाव ठेवावा आयुष्यात निर्णय घेणे किती महत्वचे असते, आत्मविश्वास हीच यशाची गुरुकिल्ली आहे, असे त्यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले, तर काही प्रात्यक्षिकेही करून दाखविली.

व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प प्रा. डॉ. मोहनराव देशमुख यांनी सामान्य माणुस आणि राजकारण या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या व्याख्यानमालेसाठी श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अक्षय कर्डिले यांचे सहकार्य लाभले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एम. जाधव हे होते तसेच आय क्यू ए सी कॉर्डिनेटर डॉक्टर शेख एच आर, परीक्षा विभाग प्रमुख प्रा. डॉक्टर मुळे बि. एम. उपस्थित होते. प्रा.माधुरी तिवारी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.शीतल भस्मे यांनी आभार मानले.


यशवंतराव चव्हाण सहकार सभागृहात संगीतकार, गायक पंडित हृदयनाथ मंगेशकर यांना विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड चा इंडियन आयकॉन अवॉर्ड प्रदान करताना डॉ. दीपक हरके आदी.

# पंडित हृदयनाथ मंगेशकर यांना इंडियन आयकॉन अवॉर्ड प्रदान

नगर – येथील यशवंतराव चव्हाण सहकार सभागृहात मराठी आणि हिंदी चित्रपट, भावसंगीत आणि शास्त्रीय संगीतातील महान संगीतकार, गायक आणि संगीत दिग्दर्शक पंडित हृदयनाथ मंगेशकर यांना विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचा इंडियन आयकॉन अवॉर्ड प्रदान करण्यात आला.

१८४ वर्ल्ड रेकॉर्ड करणारे पहिले भारतीय विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड चे अध्यक्ष डॉ. दीपक हरके व अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे महाव्यवस्थापक सुरेश पाटील यांच्या हस्ते पंडित हृदयनाथ मंगेशकर यांना इंडियन आयकॅन अवॉर्ड प्रदान करण्यात आला.

# सेवाप्रीत सोशल फाउंडेशनचा ‘उमंग २०२६ फेस्ट’ उत्साहात

## महिलांच्या सक्षमीकरणाची उमंग; महिलांनी महिलांसाठी उभारलेले बाजारपेठीय व्यासपीठ

नगर – महिलांच्या सक्षमीकरणासाठी तसेच सामाजिक क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत असलेल्या सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या वतीने आनंदधाम येथील केशर गुलाब मंगल कार्यालयात ‘उमंग २०२६ फेस्ट’ चे आयोजन करण्यात आले होते. महिलांचे उद्योग–व्यवसाय, वस्त्र, दागिने, घरगुती उत्पादने व विविध वस्तूंना थेट बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी महिलांसाठी भरविलेल्या या उमंग फेस्टला शहरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, या प्रदर्शनातून लाखो रुपयांची उलाढाल झाल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या प्रदर्शनाचे उद्घाटन शोभाताई पोपट पवार, सिमा गुलजारीलाल गुलाटी तसेच हिवरे बाजारच्या सरपंच विमलताई ठाणगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय, अर्चना खंडेलवाल, सविता चड्ढा, डॉ. सिमरन वधवा, स्विटी पंजाबी, रितू वधवा, गितांजली माळवदे, गीता नय्यर, निशा धुप्पड, कशीश जग्गी, अन्नू थापर यांच्यासह फाउंडेशनच्या महिला सदस्या उपस्थित होत्या.



महिलांच्या सक्षमीकरणासाठी तसेच सामाजिक क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत असलेल्या सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या वतीने आनंदधाम येथील केशर गुलाब मंगल कार्यालयात ‘उमंग २०२६ फेस्ट’ चे आयोजन करण्यात आले होते.

फाउंडेशनच्या अध्यक्षा जागृती ओबेरॉय म्हणाल्या, महिलांच्या सक्षमीकरणाबरोबरच दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना आधार देणे या उद्देशाने महिला एकत्र येऊन सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून योगदान देत आहेत. विविध व्यवसाय करणाऱ्या महिलांना एक सक्षम व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्या उद्योग–व्यवसायाला चालना मिळावी, यासाठीच ‘उमंग २०२६ फेस्ट’ चे आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उमंग फेस्टमध्ये महिलांनी आपल्या व्यवसायाशी निगडीत खाद्यपदार्थ, हस्तकला, विविध साहित्य, दागिने, वस्त्रांचे आकर्षक स्टॉल्स लावले होते. या स्टॉल्सना महिलांनी मोठ्या प्रमाणावर पसंती दिली. यासोबतच महिलांसाठी विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामुळे फेस्टमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा लहान व मोठा अशा दोन गटांत घेण्यात आली. लहान गटात इयत्ता तिसरी ते सहावी, तर मोठ्या गटात सहावी ते बारावीपर्यंतचे विद्यार्थी सहभागी झाले होते. विविध शाळांमधील दीडशेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला. स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली असून, सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या. या चित्रकला स्पर्धेचे परीक्षण समता लोढा यांनी केले. स्पर्धा शबनम धुप्पड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सिमरन वधवा यांनी केले. अर्चना खंडेलवाल यांनी आभार मानले. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी कशीश जग्गी यांनी परिश्रम घेतले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## लांबलचक दुधी भोपळा!



मोठ्या आकाराच्या फळांची किंवा भाज्यांची नेहमीच चर्चा होत असते. जगाच्या पाठीवर अशा काही भाज्यांनी विश्वविक्रमही केलेले आहेत. आपल्या देशातही अधूनमधून असामान्य आकाराच्या अशा फळभाज्या किंवा भाज्यांची उदाहरणे समोर येत असतात. आता मध्य प्रदेशातील मुरैना येथील अन्नुसिंह चौहान नावाच्या शेतकऱ्याच्या शेतात तब्बल ५.९ फूट लांबीचा दुधी भोपळा लागला आहे. ही दुधी खुद्द शेतकऱ्यापेक्षाही अधिक लांबीची आहे. या शेतकऱ्याची उंची ५ फूट ६ इंच आहे. याचा अर्थहा दुधी भोपळा त्याच्यापेक्षा तीन इंच अधिक लांबीचा आहे.

मुरैनाच्या धरमगढ गावातील या शेतकऱ्याचा दुधी भोपळा पाहण्यासाठी लोक गर्दी करीत आहेत. त्याच्या शेतातील या दुधीविषयी अनेक लोकांना कुतूहल आहे, पण अन्नूसिंह यांनी त्याचे बीज कुठून आणले, कशी मशागत केली वगैरे माहिती कुणालाही दिलेली नाही! काही दिवसांपूर्वी उत्तर प्रदेशातील लखीमपूर खिरीमध्येही अशी मोठी दुधी समोर आली होती. तिथे ५ फूट ६ इंच लांबीची दुधी दिसून आली. एका नर्सरीचे संचालक दविंदर पाल सिंह यांनी सांगितले की, त्यांनी सुमारे दोन महिन्यांपूर्वी या दुधीची वेल लावली होती. आता या वेलीला ५ फूट ६ इंचांपेक्षाही अधिक लांबीचा हा दुधी भोपळा लागला आहे.



## कहाणी सर्वात महागड्या टोस्टची

अॅव्हाकोडो हे फळ म्हणजे पोषक तत्त्वांचा खजिनाच आहे. आता केवळ सेलिब्रिटीच नव्हे तर सर्वसामान्य लोकांच्याही आहारामध्ये हे गुणकारी फळ समाविष्ट झाले आहे. मेक्सिको आणि मध्य अमेरिकेतील हे फळ प्रोटीन व अन्य पोषक घटकांनी संपन्न असते. त्याचा सॅलेड व टोस्टमधील वापरही लोकप्रिय होत आहे. आता या फळाचा वापर करून बनवलेले एक टोस्ट आपल्या देशात सर्वात महागडे ठरले आहे. गुजरातच्या सुरतमधील एका स्ट्रीट वेंडरने अॅव्हाकोडो टोस्ट लोकप्रिय केले आहे. या टोस्टची किंमत १३ हजार रुपयांपर्यंत आहे!

इन्स्टाग्रामवरील एका यूजरने याबाबतचे एक रील शेअर केले आहे. त्यामध्ये हा विक्रेता अॅव्हाकोडो टोस्ट बनवत असताना दिसून येतो. अॅव्हाकोडोच्या तुकड्यांना तो ऑलिव्ह ऑईल, तीळ, खास मसाले आणि लिंबूच्या रसात मिसळतो. त्यानंतर यामध्ये तो एक विशेष चीज टाकतो, ज्यामुळे हे टोस्ट अतिशय महागडे बनते. या टोस्टचे मुख्य आकर्षण आहे हे 'पुले चीज'. हे चीज जगातील सर्वात महागड्या व दुर्मीळ चीजपैकी एक आहे. हे चीज सर्बियाच्या जासाविका स्पेशल नेचर रिझर्व्हमधून येते. ते बनवण्यासाठी ६० टक्के गाढविणीचे दूध आणि ४० टक्के बकरीचे दूध यांचे मिश्रण वापरले जाते. या चीजचा स्वाद अतिशय खास असतो. पुले चीज बनवण्यासाठी गाढविणीच्या ६.५ गॅलन दुधाची गरज असते. एक गाढवीण सहा महिन्यात केवळ एक गॅलनच दूध देते. त्यामुळेच हे चीज इतके दुर्मीळ व महाग आहे. या चीजची किंमत ८३ हजार रुपये प्रति किलो आहे. हे चीज टोस्टमध्ये वापरल्याने हे अॅव्हाकोडो टोस्ट महाग बनते. १३ हजार रुपयांचे टोस्ट खाण्याबाबत अनेक युजर्सनी अर्थातच संमिश्र प्रतिक्रिया दिलेल्या आहेत!

## वाळवंटातला जलप्रलय



राजस्थानमधील जैसलमेर जिल्ह्यातील मोहनगडमधून एक विचित्र प्रकार समोर आला आहे. येथे बोअर खोदत असताना अचानक जमिनीतून आवाज झाला आणि पाण्याचा मोठा फवारा उसळून वर आला. या खड्ड्यातून वेगाने पाणी वर येत होतं. धक्कादायक बाब म्हणजे खोदकामाची उपकरणं आणि ट्रकदेखील या खड्ड्यात गेला. या घटनेनंतर मोहनगडमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. वाळवंटी भागात अचानक पाण्याचा मोठा फवारा वर आल्यानं आश्चर्य व्यक्त केलं जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विक्रम सिंह भाटी यांच्या शेतात बोअरवेलचं खोदकाम सुरु होतं. त्यानंतर अचानक जमीन फाटली आणि दबावाने पाणी, गॅस बाहेर येऊ लागला. याबाबत माहिती मिळताच जिल्हाधिकारी घटनास्थळी दाखल झाले. या घटनेनंतर ५०० मीटरपर्यंतचा परिसर रिकामा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जवळपास ८५० फुटांपर्यंत बोअरवेल खोदण्यात आली होती. पाण्याचा शोध सुरु असताना अचानक जमिनीवरून मोठ्या वेगाने पाणी बाहेर येऊ लागलं. यावेळी मशिनीसह ट्रकही जमिनीत गाडला गेला आणि पाण्याचे १० फूट उंच कारंजे उडू लागले. पाण्याच्या कारंज्यासह गॅसही बाहेर येऊ लागला. गॅस बाहेर येऊ लागल्याने गावकऱ्यांसह प्रशासनामध्ये चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे. हा गॅस कसला आहे, याचा शोध घेण्यासाठी ओएनजीसी, केअरन एनर्जी, ऑईल इंडियाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पाण्याच्या प्रवाहामुळे आजूबाजूचा ५०० मीटरहून अधिकच्या परिसराला तलावाचं रूप आलं होतं.

## जगज्जेत्याच्या युद्धभूमीचा शोध



जगज्जेत्या अलेक्झांडरने प्राचीन पर्शियन लोकांशी ज्याठिकाणी युद्ध केले होते, त्या युद्धभूमीचा आता शोध लावण्यात आला आहे. पर्शियन साम्राज्याविरुद्ध 'अलेक्झांडर द ग्रेट' याने जे ग्रॅनिकसचे युद्ध लढले त्या ठिकाणाची संशोधकांना ओळख पटली आहे. हे ठिकाण वायव्य तुर्कीमधील बिगा शहरापासून उत्तरेला दहा किलोमीटरवर आहे. इसवी सनपूर्व ३३४ या वर्षी अलेक्झांडरच्या सैन्याने याच युद्धभूमीवर पर्शियन सैन्याचा पराभव केला होता.

या युद्धातील विजयामुळे अलेक्झांडरला पर्शियन साम्राज्यात पाय रोवण्यास मदत मिळाली होती. तसेच या विजयामुळेच त्याचे सैन्य मध्यपूर्वेत अधिक आतपर्यंत घुसू शकले होते. कॅनाक्कले ओन्सेकिझ मार्ट युनिव्हर्सिटीतील पुरातत्त्व विभागाचे प्राध्यापक रेहान कॉर्पे यांच्या नेतृत्वाखालील संशोधकांच्या पथकाने हे संशोधन केले. रेहान कॉर्पे यांनी सांगितले की, ग्रॅनिकसचे युद्ध हे अलेक्झांडरच्या जीवनातील एक महत्त्वाचा 'टर्निंग पॉईंट' ठरले होते. याच युद्धामुळे नंतरच्या काळात त्याच्या नावापुढे 'द ग्रेट' हे बिरुद लागले. हे युद्ध यामुळेच महत्त्वाचे आहे असे नाही. या युद्धाचे तत्कालीन जगावर परिणाम झाले, तसेच हे युद्ध म्हणजे जगाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पाही ठरले. १९ व्या शतकात हेनरीच किपर्ट या पुरातत्त्व संशोधकाने या भागात संशोधन केले होते. हेच या युद्धाचे ठिकाण असावे, असे त्यांनीही त्यावेळी म्हटले होते. मात्र आता त्याची पुष्टी करणारे पुरावे नव्या संशोधनातून समोर आले आहेत. याठिकाणी हर्मोओन नावाच्या प्राचीन शहराचे अवशेष सापडले, ज्याचा उल्लेख प्राचीन नोंदींमध्ये आहे. सध्या ग्रॅनिकस नदीचे पात्र अलेक्झांडरच्या काळापेक्षा थोडे बदलले आहे. मात्र अनेक गोष्टी तशाच आहेत.



## विमानात जन्मलेल्या बाळाच्या नागरिकत्वाविषयी...



जन्म आणि मृत्यू कधी व कुठे होईल हे काही सांगता येत नाही. जन्माचा विचार करता जिथे तुम्ही जन्मता, तो देश तुमचा असतो. त्या देशाचे नागरिकत्व तुम्हाला आपोआप मिळालेले असते. त्यासाठी तुम्हाला काही वेगळी धडपड करावी लागत नाही. किंवा तुम्ही एखाद्या देशात आला आणि कायदेशीर सोपस्कार पार पाडले तर तुम्हाला त्या देशाचं नागरिकत्व मिळतं. मग भलेही तुमचा जन्म कोणत्याही दुसऱ्या देशात झालेला असो. कारण तुमच्या इच्छेनुसार तुम्ही त्या देशाला आपला देश म्हणून निवडलेलं असतं आणि त्या देशाचे नियम पाळलेले असतात. पण विमानात जन्म झाला, तर त्या बाळाला कोणत्या देशाचे नागरिकत्व मिळेल? आणि त्याच्या जन्म प्रमाणपत्रावर जन्मस्थान म्हणून काय लिहावे लागेल? याबद्दलच्या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी आपल्याला काही महत्त्वाचे मुद्दे लक्षात घ्यावे लागतील.

साधारणतः गर्भवती महिलांनी गर्भावस्थेच्या नवव्या महिन्यात प्रवास करणे टाळले पाहिजे. भारतात ७ महिन्यांपेक्षा जास्त काळाच्या गर्भवती असलेल्या महिलांना विमानाने प्रवास करण्याची परवानगी दिली जात नाही. परंतु काही विशेष परिस्थितींमध्ये ते शक्य असते. समजा, भारतातून अमेरिकेकडे जाणाऱ्या विमानात एक महिला बाळाला जन्म देते. अशा परिस्थितीत त्या मुलाचे जन्मस्थान काय असावे? त्याला नागरिकत्व कशा प्रकारे मिळेल? हे महत्त्वाचे प्रश्न आहेत.

उड्डाण करत असताना, विमान जिथून उड्डाण घेते त्या देशाच्या सीमा ओलांडून जर मुलाचा जन्म झाला, तर त्या देशाचे नाव जन्म प्रमाणपत्रावर लिहिले जाईल. उदाहरणार्थ, जर भारताच्या हद्दीतून विमान जात असताना श्रीलंकेच्या एखाद्या महिलेने बाळाला जन्म दिला तर त्या बाळाचे जन्मस्थान भारत असे लिहिले जाईल. परंतु त्याच्या माता-पित्याचे नागरिकत्व श्रीलंकेचे असल्यामुळे, त्याला श्रीलंकेचे नागरिकत्व देखील मिळू शकते. अमेरिकेत काही वर्षांपूर्वी अशी एक घटना घडली होती. विमानात जन्मलेल्या एका मुलाला अमेरिकेचे नागरिकत्व मिळाले. कारण विमान अमेरिकेच्या सीमा ओलांडताना त्या मुलाचा जन्म झाला. अशा परिस्थितीत त्या मुलाला नंतर दुहेरी नागरिकत्व (अमेरिकन आणि नेदरलँड्स) मिळाले. कारण त्याचे पालक नेदरलँड्सचे होते. काही देशांमध्ये विमानात जन्मलेल्या मुलाच्या नागरिकत्वाबाबत विविध नियम असू शकतात. काही देशांमध्ये अशा प्रकारच्या घटनांवर ठरवलेले विशिष्ट कायदे आहेत. काही देशांमध्ये या संदर्भात काही ठरवलेले नियम नाहीत.

## अवघ्या वीस लोकांचे बेट



जगाच्या पाठीवर एक बेट असं आहे, जिथे फक्त २० लोकच राहतात. ग्रिमसे असे या बेटाचे नाव आहे. हे बेट फक्त ६.५ चौरस किलोमीटरमध्ये पसरले आहे. आइसलँडच्या उत्तरेकडील किनारपट्टीपासून ते सुमारे ४० किलोमीटर अंतरावर आहे. आर्क्टिक सर्कलमध्ये येणारा हा एकमेव भाग आहे. ग्रिमसे येथे एकही रुग्णालय, डॉक्टर किंवा पोलिस ठाणे नाही. दर तिसऱ्या आठवड्यात एक डॉक्टर येथे विमानाने येतो आणि इथल्या लोकांची तपासणी करतो. सुरक्षेच्या बाबतीत तटरक्षक दल आणि आपत्कालीन सेवा यांनी आपत्कालीन परिस्थितीमध्ये काय करावे यासाठी या बेटावर राहणाऱ्या लोकांना प्रशिक्षण दिले आहे. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत हे लोक स्वतःहून त्या आव्हानांना सामोरे जातात. बेटावर एक रेस्टॉरंट, बार, स्विमिंग पूल, लायब्ररी, चर्च आणि एअरस्ट्रिप आहे. याशिवाय एक किराणा दुकान देखील आहे. ते दररोज एक तास सुरू असते. ग्रिमसे बेट खूपच दुर्गम आहे. येथे विद्युत वाहिनी पोहोचलेली नाही. संपूर्ण बेट डिझेल जनरेटरवर चालते.

हवामानाच्या दृष्टीने आणि सागरी पक्ष्यांसाठी हे बेट नंदनवन आहे. याबाबतीत या बेटाची समृद्धता पाहण्यासारखी आहे. प्रत्येक ऋतूत इथे वेगळा अनुभव मिळतो. हिवाळ्यात अंधाराबरोबरच वादळे येतात. येथे वसंत ऋतूमध्ये दिवे आणि पक्षी येतात. पक्षी निरीक्षणाची आवड असणाऱ्या लोकांसाठी हे बेट म्हणजे एक मोठा खजिना आहे. कारण येथे लाखो सागरी पक्षी येतात. एका सर्वेक्षणानुसार येथे प्रतिव्यक्तीमागे ५० हजार पक्षी आहेत. या बाबतीत इथले लोक खूप श्रीमंत आहेत. पण काही समुद्री पक्षी थोडे धोकादायक देखील आहेत. तुम्ही जर त्यांच्या घरट्या जवळ गेलात तर ते तुमच्यावर हल्ला करतात. आर्क्टिक टर्न याबाबत आक्रमक असतात. याशिवाय येथे आइसलँडिक घोडे आणि मेंढ्या देखील दिसतात. त्यामुळे येथे पर्यटकही येतात. बहुतेक लोक येथे नैसर्गिक दृश्ये आणि समुद्री पक्षी पाहण्यासाठी येत असतात. पृथ्वी २३.५ अंशाने झुकत असल्यामुळे आर्क्टिक सर्कल येथे दरवर्षी थोडेसे बदलते. हा बदल पाहण्यासाठी येथे एक वर्तुळ आहे जे दरवर्षी सुमारे १४ मीटरने सरकते, परंतु काहीवेळा ते १३० मीटरपर्यंत देखील सरकले आहे.

## खेकड्यांबाबत नवं संशोधन

जगभरात अनेक लोक खेकडे आवडीने खातात. त्यासाठी आधी खेकड्यांना जिवंतच उकळत्या पाण्यात टाकले जात असते. त्यामागे असा एक समज आहे की, खेकड्यांना वेदना होत नाहीत! वेदना जाणवण्यासाठी त्यांच्याकडे संबंधित मेंदूचा भागच नसतो असे मानले जाते. यामध्ये किती तथ्य आहे हे संशोधकांनी पडताळून पाहिले. शोअर क्रॅब्स (कार्सिनस मेनस) या खेकड्यांमध्ये मात्र वेदना जाणवतात, असे आढळून आले. याबाबतच्या संशोधनाची माहिती 'बायोलॉजी' या नियतकालिकात देण्यात आली आहे.



संशोधकांना आढळले की, या खेकड्यांमध्ये नोसिसेप्टर्स असतात. हे चेतातंतू शरीराला झालेल्या इजेचा छडा लावतात आणि मेंदूला वेदनेचे सिग्नल्स पाठवतात. संशोधकांनी वेदनादायक उत्तेजनेला हे खेकडे कसा प्रतिसाद देतात याबाबतचा अभ्यास २० खेकड्यांच्या माध्यमातून केला. त्यासाठी त्यांनी प्लास्टिकच्या टोकदार वस्तूने टोचणे, डोळ्यांमध्ये किंवा अँटेनामध्ये थोडेसे व्हिनेगार टाकणे असे प्रकार केले. त्यांच्या केंद्रीय चेतासंस्थेच्या प्रतिसादाला इलेक्ट्रोडसच्या सहाय्याने मोजण्यात आले. त्यावेळी असे दिसून आले की, नोसिसेप्टीव्ह रिस्पॉन्स मिळतो. सागरी पाण्यासारखा वेदनारहित घटकाचा वापर केल्यावर असा प्रतिसाद मिळत नसल्याचेही दिसून आले. मानव आणि अन्य काही सस्तन प्राण्यांमध्येही नोसिसेप्टर्स असतात. ज्यावेळी शरीराला दुखापत झाली किंवा जखमेमुळे जीव धोक्यात आला तर ते सक्रिय होतात. ते वेदनेच्या जाणिवेतून मेंदूशी संपर्क साधतात आणि शरीर भावी संकटाचा सामना करण्यासाठी तयार होते. त्यामुळे एखादा प्राणी जलद हालचाली करतो किंवा योग्य तो प्रतिसाद देतो. यापूर्वीही एका संशोधनात झिंगे व खेकडे वेदनेबाबतचा प्रतिसाद देतात, असे आढळले होते.

## आयव्हरी कॉस्टची स्वातंत्र्यगाथा



संपूर्ण जगाला चॉकलेट खाऊ घालणाऱ्या आयव्हरी कॉस्ट या पश्चिम आफ्रिकेतील चिमुकल्या देशाला आता खरे स्वातंत्र्य मिळाले आहे. एके काळी हा देश फ्रान्सची वसाहत होती. तसे पाहता १९६० मध्येच फ्रान्सने या देशाला स्वातंत्र्य दिले होते. पण फ्रान्सचे सैनिक अजूनही तिथे मुक्काम ठोकून असत. आता मात्र आयव्हरी कॉस्टने या फ्रेंच सैनिकांना 'चले जाव' असे सांगितले आहे. त्यांच्या परतीची प्रक्रिया याच महिन्यात सुरु होईल.

जगाचा नकाशा पाहिला तर पश्चिम आफ्रिकेत घानाजवळ आयव्हरी कॉस्ट दिसून येईल. याच छोट्याशा देशात सर्वाधिक कोको बिन्स तयार होतात, ज्या चॉकलेट बनवण्यासाठी गरजेच्या असतात. लांब पपईसारख्या दिसणाऱ्या फळामध्ये या कोकोच्या बिया असतात. कोकोची रोपे तयार होण्यासाठी चार वर्षे लागतात. वर्षातून दोन वेळा या झाडाला फळे लागतात. त्यामधील कोको बिन्ससाठी हा देश जगभर ओळखला जातो. १९६० मध्ये फ्रान्सपासून स्वातंत्र्य मिळूनही या देशाला फ्रेंच सैनिकांच्या उपस्थितीमुळे स्वातंत्र्य मिळाले आहे असे वाटत नव्हते. आता मात्र या सैनिकांना देश सोडण्याचे फर्मान काढले आहे. आयव्हरी कॉस्टचे राष्ट्राध्यक्ष अलास्साने ओऊटारा यांनी सांगितले की, याच महिन्यात फ्रेंच सैनिकांच्या परतीच्या प्रवासाची प्रक्रिया सुरु होईल. सध्या आयव्हरी कॉस्टमध्ये फ्रान्सचे सहाशे सैनिक आहेत. पोर्ट बोएटच्या सैन्य बटालियनची धुरा आता आयव्हरी कॉस्टच्याच सैन्याकडे जाईल. आतापर्यंत ही जबाबदारी फ्रान्सचे सैनिक सांभाळत होते. आयव्हरी कॉस्टशिवाय पश्चिम आफ्रिकेतील अन्यही अनेक देशांनी आपापल्या देशातील फ्रेंच सैनिकांना त्यांच्या देशात परत जाण्यास सांगितले आहे. त्यामध्ये सेनेगल, माली, चाड, नाइजर आणि बुर्किना फासो यांचा समावेश आहे. या देशांमध्येही अनेक वर्षांपासून फ्रेंच सैनिक आहेत. फ्रान्सचे सैनिक आता ७० टक्क्यांपेक्षा अधिक आफ्रिकन देशांमधून निघून गेले आहेत. सध्या जिबूतीमध्ये फ्रान्सचे १५०० तर गॅबॉनमध्ये ३५० सैनिक आहेत.

# अहिल्यानगर महानगरपालिकेत उमेदवारनिहाय मिळालेली मते

### प्रभाग क्रमांक १- अ (अनुसूचित जाती)

| | | |
|---|---|---|
| १) प्रमोद रमेश आढाव | आम आदमी पार्टी | ४८९ |
| २) ऋषिकेश लक्ष्मण थोरात | राष्ट्रवादी शरद पवार | १४६० |
| **३) सागर अर्जुन बोरुडे** | **राष्ट्रवादी अजित पवार** | **११९५०** |
| ४) नोटा | | ६७१ |

### प्रभाग क्र. १ ब - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)

| | | |
|---|---|---|
| १) ज्योती सतीश ढवण | राष्ट्रवादी अजित पवार | ५८४८ |
| **२) शारदा दिगंबर ढवण** | **भाजप** | **८३५६** |
| ३) नोटा | | ३६६ |

### प्रभाग क्र. १ क सर्वसाधारण (महिला)

| | | |
|---|---|---|
| **१) दीपाली नितीन बारस्कर** | **राष्ट्रवादी (अ.प.)** | **१२३४३** |
| २) संस्कृती किशोरकुमार हालदार | राष्ट्रवादी शरद पवार | ११२५ |
| ३) आरती मच्छिंद्र उफाडे | अपक्ष | १९९ |
| ४) अश्विनी विलास सांगळे | अपक्ष | ३७८ |
| ५) नोटा | | ५२५ |

### प्रभाग क्र. १ ड सर्वसाधारण

| | | |
|---|---|---|
| १) प्रताप सुरेश गडाख | शिंदेसेना | ११०३ |
| **२) संपत विजय बारस्कर** | **राष्ट्रवादी अजित पवार** | **१०७१८** |
| ३) रामदास विठ्ठल वाणी | राष्ट्रवादी शरद पवार | २३३८ |
| ४) नोटा | | ४११ |

### प्रभाग क्रमांक २-अ (अनुसूचित जाती महिला)

| | | |
|---|---|---|
| १) रोशनी आकाश त्र्यंबके | भाजप | ९०७६ |
| **२) प्रतिक्षा गौतम शिंदे** | **राष्ट्रवादी (शरद पवार)** | **१८०७** |
| ३) उषा मंगेश भिंगारदिवे | अपक्ष | ६६० |
| ४) नोटा | | ६६८ |

### प्रभाग क्रमांक २-ब (नागरिकांचा मागास प्रवर्ग)

| | | |
|---|---|---|
| १) अमोल बाबासाहेब खाडे | राष्ट्रवादी (शरद पवार) | १९५५ |
| २) अभिनय लालेशकुमार गायकवाड | काँग्रेस | ६८३ |
| **३) महेश रघुनाथ तवले** | **राष्ट्रवादी (अजित पवार)** | **९०६०** |
| ४) नोटा | | ५१२ |

### प्रभाग क्रमांक २-क (सर्वसाधरण महिला)

| | | |
|---|---|---|
| **१) सुनिता कैलास झिने** | **राष्ट्रवादी (शरद पवार)** | **२३१२** |
| २) संध्या बाळासाहेब पवार | राष्ट्रवादी (अजित पवार) | १९४३ |
| ४) नोटा | | ७५६ |

### प्रभाग क्रमांक २-ड (सर्वसाधरण)

| | | |
|---|---|---|
| १) दीपक पांडुरंग दरंदले | राष्ट्रवादी (शरद पवार) | २३५३ |
| **२) निखील बाबासाहेब वारे** | **भाजप** | **८९९४** |
| ३) दिगंबर कैलास झिन | अपक्ष | १२९ |
| ४) प्रशांत अशोक पाटील | अपक्ष | ३५२ |
| ५) संदीप बापु यादव | अपक्ष | २३३ |
| ६) नोटा | | २४९ |

### प्रभाग क्रमांक ३-अ (नागरिकांचा मागास प्रवर्ग)

| | | |
|---|---|---|
| **१) योगीराज शशीकांत गाडे** | **उद्धवसेना** | **३४५३** |
| २) प्रविण शिवनाथ गायकवाड | मनसे | ८९ |
| ३) उषा शिवाजीराव नलवडे | भाजप | २९१३ |
| ४) चंद्रकांत सुर्यभान शेळके | शिंदेसेना | १५५५ |
| ५) शुभम अशोक दहिफळे | अपक्ष | २९ |
| ६) जयंत तिपन्ना येलुलकर | अपक्ष | २९९ |
| ७) नोटा | | १४६ |

### प्रभाग क्रमांक ३-ब (सर्वसाधारण महिला)

| | | |
|---|---|---|
| १) संगिता रत्नाकर खरमाळे | शिंदेसेना | २१९९ |
| **२) ज्योती अमोल गाडे** | **राष्ट्रवादी अजित पवार** | **४५४६** |
| ३) प्रतिमा सुहास देशपांडे | आम आदमी पार्टी | १३१ |
| ४) निलम विपुल वाखुरे | उद्धवसेना | ११८६ |
| ५) सोनाली वैभव झोटींग | अपक्ष | १२३ |
| ६) नोटा | | ३०० |

### प्रभाग क्रमांक ३-क (सर्वसाधारण महिला)

| | | |
|---|---|---|
| १) अनिता प्रशांत दारकुंडे | उद्धवसेना | १०४० |
| २) स्वप्नजा विनय वाखुरे | शिंदेसेना | १३८९ |
| **३) गौरी अजिंक्य बोरकर** | **राष्ट्रवादी अजित पवार** | **५७९९** |
| ४) नोटा | | २५७ |

### प्रभाग क्रमांक ३-ड (सर्वसाधारण)

| | | |
|---|---|---|
| **१) ऋग्वेद महेंद्रभैय्या गंधे** | **भाजप** | **३४७९** |
| २) प्रशांत अरविंद दरेकर | आम आदमी पार्टी | १५९ |
| ३) नितीन शिवाजी शेलार | शिंदे सेना | २५०२ |
| ४) केतन सुहास क्षीरसागर | उद्धवसेना | १७४० |
| ५) सुमित संजय डापसे | अपक्ष | १७६ |
| ६) अभिजीत अशोक दरेकर | अपक्ष | ५० |
| ७) अर्जुन मनोज मदान | अपक्ष | १६९ |
| ६) अमोल लक्ष्मण हुंबे | अपक्ष | ७ |
| ७) नोटा | | २०२ |

### प्रभाग क्र. ४-अ (नागरिकांचा मागास प्रवर्ग)

| | | |
|---|---|---|
| १) शेख नसीम खानसाहेब | काँग्रेस | ५५९९ |
| **२) शेख शहेनाज खलिद** | **एमआयएम** | **६५९१** |
| ३) सय्यद आयेशा इब्राहिम | समाजवादी पार्टी | १७५ |
| ४) माधुरी धनंजय गाडे | एकलव्य पार्टी | ६५६ |
| ५) शेख अफसाना मोहम्मदनवाज | अपक्ष | ९० |
| ६) नोटा | | १०७ |

### प्रभाग क्र. ४ ब (नागरिकांचा मागास प्रवर्ग)

| | | |
|---|---|---|
| १) शेख फयाजोद्दीन अजिजोद्दीन | काँग्रेस | ५२०४ |
| २) मीर असिफ सुलतान | समाजवादी पार्टी | ५७७ |
| **३) सय्यद शाहबाज अहमद** | **एमआयएम** | **६२९८** |
| ४) संजय बाबूराव गाडे | एकलव्य पार्टी | ६२६ |
| ५) शेख मुदस्सर अहमद | अपक्ष | ३५१ |
| ६) सय्यद हाफीयोद्दीन | अपक्ष | ५२ |
| ७) नोटा | | ११० |

### प्रभाग क्र. ४ क (सर्वसाधारण महिला)

| | | |
|---|---|---|
| **१) खान मिनाज जाफर** | **काँग्रेस** | **६०९४** |
| २) शेख शबनम इमरान | समाजवादी पार्टी | ४५९ |
| ३) शेख सलमा जाकीर | एमआयएम | ५६८७ |
| ४) अलका अरुणराव निंबाळकर | एकलव्य पार्टी | ५०७ |
| ५) शेख सायराबानो बशीर | अपक्ष | ३५६ |
| ६) नोटा | | ११५ |

### प्रभाग क्र. ४ ड (सर्वसाधारण)

| | | |
|---|---|---|
| **१) खान शम्स समीउल्ला** | **काँग्रेस** | **६२९३** |
| २) खान समद वहाब | एमआयएम | ६१५८ |
| ३) शेख इम्रान शफी | समाजवादी पार्टी | १८८ |
| ४) भास्कर मारुती पांडूळे | एकलव्य पार्टी | ४७४ |
| ५) नोटा | | १०४ |

### प्रभाग क्र. ५ अ (अनुसूचित जाती महिला)

| | | |
|---|---|---|
| १) शीला दीप चव्हाण | राष्ट्रवादी (श. पवार) | ३०८० |
| **२) काजल गोरख भोसले** | **राष्ट्रवादी (अ. पवार)** | **५९८८** |
| ३) शीतल संजय वडागळे | शिंदेसेना | ११७३ |
| ४) प्रियंका अरुण अब्राहम | अपक्ष | ४६४ |
| ५) नीता विकास उडाणशिवे | अपक्ष | १०६ |
| ६) सय्यद सना मोहम्मदअली | अपक्ष | १४६ |
| ७) नोटा | | २५४ |

### प्रभाग क्र. ५ ब (नागरिकांचा मागास प्रवर्ग)

| | | |
|---|---|---|
| **१) धनंजय कृष्णा जाधव** | **भाजप** | **७६३०** |
| २) प्रदीप अमरसिंग परदेशी | राष्ट्रवादी शरद पवार | १८३६ |
| ३) सुनील भारत भोसले | उद्धवसेना | ३६१ |
| ४) अशोक शामराव दहिफळे | अपक्ष | १०७ |
| ५) नोटा | | २७७ |

### प्रभाग क्र. ५ क (सर्वसाधारण महिला)

| | | |
|---|---|---|
| १) उषा सदानंद उणवणे | राष्ट्रवादी शरद पवार | ३१८२ |
| **२) हरप्रीतकौर जगजीतसिंग गंभीर** | **राष्ट्रवादी अजित पवार** | **४२२७** |
| ३) धनश्री सागर साठे | अपक्ष | ७८१ |
| ४) निकिता विक्रम गायकवाड | अपक्ष | ६८ |
| ५) नंदा पोपट पाथरे | अपक्ष | ४०३ |
| ६) दामिनी अनिल शेकटकर | अपक्ष | ११८३ |
| ७) शबाना शफी सय्यद | अपक्ष | १२२ |
| ८) नोटा | | २४५ |

### प्रभाग क्र. ५ ड (सर्वसाधारण)

| | | |
|---|---|---|
| **१) मोहित प्रदीप पंजाबी** | **राष्ट्रवादी अजित पवार** | **४९१६** |
| २) अफनान समीर शेख | राष्ट्रवादी शरद पवार | २५२५ |
| ३) बलराम अशोक सचदेव | अपक्ष | ५९९ |
| ४) अजीम शकील सय्यद | अपक्ष | ८२ |
| ५) अफताब शफी सय्यद | अपक्ष | ९९ |
| ६) अविनाश श्रीधर साठे | अपक्ष | १७४० |
| ७) नोटा | | २५० |

### प्रभाग क्रमांक ६-अ (नागरिकांचा मागास प्रवर्ग)

| | | |
|---|---|---|
| **१) मनोज लक्ष्मण दुल्लम** | **भाजप** | **४७४७** |
| २) रामा अण्णा शिंदे | आम आदमी पार्टी | १९० |
| ३) मनोज सुखदेव राऊत | राष्ट्रवादी शरद पवार | १०६६ |
| ४) अमित दत्तात्रय खामकर | अपक्ष | ३५३८ |
| ५) नोटा | | २९९ |

### प्रभाग क्र. ६ ब (सर्वसाधारण महिला)

**१) सोनाबाई तायगा शिंदे — भाजप – बिनविरोध**

### प्रभाग क्र. ६ क (सर्वसाधारण महिला)

| | | |
|---|---|---|
| **१) सुनीता श्रीकृष्ण कुलकर्णी** | **भाजप** | **३९१५** |
| २) रूपाली गणेश आप्रे | उद्धवसेना | २७४ |
| ३) शोभा साहेबराव भिंगारदिवे | राष्ट्रवादी शरद पवार | २५६७ |
| ४) शांता दशरथ शिंदे | शिंदेसेना | १७२९ |
| ५) वीणा श्रीनिवास बोज्ञा | अपक्ष | १०९७ |
| ६) नोटा | | २५७ |

### प्रभाग क्र. ६ ड (सर्वसाधरण)

**१) करण उदय कराळे — भाजप – बिनविरोध**

### प्रभाग क्रमांक ७-अ (अनुसूचित जमाती)

| | | |
|---|---|---|
| १) धनंजय पोपट गोलवड | शिंदेसेना | २३६० |
| २) महेश सखाराम शेळके | उद्धवसेना | ८८१ |
| **३) वर्षा रोहन सानप** | **भाजप** | **५६३१** |
| ४) अनिता लक्ष्मण दळवी | अपक्ष | २१६ |
| ५) नोटा | | ४८० |

### प्रभाग ७-ब (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला)

**१) पुष्पा अनिल बोरुडे — भाजप– बिनविरोध**

### प्रभाग ७-क (सर्वसाधारण महिला)

| | | |
|---|---|---|
| **१) वंदना विलास ताठे** | **भाजप** | **५७०९** |
| २) प्रतिभा अक्षय भगत | राष्ट्रवादी शरद पवार | १३०४ |
| ३) सारिका हनुमंत भुतकर | शिंदेसेना | २३३३ |
| ४) नोटा | | २२३ |

### प्रभाग ७-ड (सर्वसाधारण)

| | | |
|---|---|---|
| १) भरत श्रीराम खाकाळ | आम आदमी पार्टी | २६० |
| २) प्रशांत सुभाष जाधव | मनसे | ११९ |
| ३) गोरख अर्जुनराव बोरुडे | शिंदेसेना | २७७७ |
| **४) बाबासाहेब सोन्याबापू वाकळे** | **भाजप** | **५७३२** |
| ५) योगेश बाबासाहेब सुडके | राष्ट्रवादी शरद पवार | ४८४ |
| ६) नोटा | | १९७ |

### प्रभाग क्रमांक ८-अ (अनुसूचित जमाती महिला)

| | | |
|---|---|---|
| १) मीना संजय देठे | राष्ट्रवादी शरद पवार | ७०३ |
| २) प्रियंका मनोज प्रभुणे | शिंदेसेना | ३८७२ |
| **३) सुनीता किसन भिंगारदिवे** | **राष्ट्रवादी अजित पवार** | **७७९९** |
| ४) सविता राजू देठे | अपक्ष | १४८ |
| ५) राणी सुनील भालेराव | अपक्ष | ६६८ |
| ६) भारती विकास वाघमारे | अपक्ष | १२३ |
| ७) नोटा | | ३३४ |

### प्रभाग क्रमांक ८ ब - (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला)

| | | |
|---|---|---|
| **१) आशाबाई लोभाजी कातोरे** | **भाजप** | **१०७२४** |
| २) पूनम अतुल लगड | शिंदेसेना | २६८७ |
| ३) नोटा | | २३६ |

### प्रभाग क्रमांक ८ क (सर्वसाधारण)

| | | |
|---|---|---|
| **१) नवनाथ मच्छिंद्र कातोरे** | **शिंदेसेना** | **६७३९** |
| २) बाबासाहेब संतोष नागरगोजे | राष्ट्रवादी अजित पवार | ६६९५ |
| ३) नोटा | | २१३ |

### प्रभाग क्रमांक ८ड (सर्वसाधारण)

**कुमार बबनराव वाकळे — राष्ट्रवादी अजित पवार बिनविरोध**

### प्रभाग क्र. ९-अ (अनुसूचित जाती)

| | | |
|---|---|---|
| १) दीप नारायण चव्हाण | काँग्रेस | २९७६ |
| २) किरण रमेश दाभाडे | राष्ट्रवादी (अजित पवार) | ३६०४ |
| **३) संजय छगनराव शेंडगे** | **शिंदेसेना** | **४८३४** |
| ४) चेतन पांडुरंग शेलार | अपक्ष | १६९ |
| ५) नोटा | | ३१० |

### प्रभाग क्र.९ ब (ना.म.प्र. महिला)

| | | |
|---|---|---|
| **१) रूपाली संदीप दातरंगे** | **शिंदेसेना** | **५५४६** |
| २) राणी दीपक दांगट | मनसे | ५८८ |
| ३) पद्मा विजयकुमार बोरूडे | भाजप | ५०६८ |
| ४) स्वाती विनोद काकडे | अपक्ष | २०८ |
| ५) नोटा | | ४८२ |

### प्रभाग क्र. ९ क (सर्वसाधारण महिला)

| | | |
|---|---|---|
| **१) वैशाली शाम नळकांडे** | **शिंदेसेना** | **५०९६** |
| २) सीमा युवराज शिंदे | राष्ट्रवादी (अजित पवार) | ३४५४ |
| ३) शेख नसीम आरिफ शेख | राष्ट्रवादी (शरद पवार) | १९९९ |
| ४) शोभा राजू आल्हाट | वंचित बहुजन आघाडी | १६६ |
| ५) श्रृती अरविंद शिंदे | अपक्ष | १२५२ |
| ६) नोटा | | २२५ |

### प्रभाग क्र. ९ ड (सर्वसाधारण)

| | | |
|---|---|---|
| १) गिरीष तुकाराम जाधव | राष्ट्रवादी (शरद पवार) | २१०३ |
| **२) महेश राम लोंढे** | **भाजप** | **६२४०** |
| ३) सचिन चंद्रशेखर शिंदे | शिंदेसेना | ३२६७ |
| ४) नोटा | | २८३ |

### प्रभाग क्र. १०-अ (ना.मा.प्र.)

| | | |
|---|---|---|
| **१) श्रीपाद शंकर छिंदम** | **बहुजन समाज पक्ष** | **८२५८** |
| २) महेंद्र दत्तात्रय बिज्ञा | भाजप | ५२९९ |
| ३) शाहिस्ता तनवीर पठाण | एमआयएम | १२५६ |
| ४) अजयकुमार अरुण लयचेट्टी | अपक्ष | ६८ |
| ५) नोटा | | २७९ |

### प्रभाग क्र.१० ब (सर्वसाधारण महिला)

| | | |
|---|---|---|
| १) पूजा विकी इंगळे | बहुजन समाज पक्ष | ६२०२ |
| **२) शितल अजय ढोणे** | **भाजप** | **६६७१** |
| ३) संपदा सुशांत म्हस्के | उद्धवसेना | १५७५ |
| ४) कीर्ती ऋषिकेशे गुंडला | अपक्ष | ३७८ |
| ५) नोटा | | ३३५ |

### प्रभाग क्र. १० क (सर्वसाधारण महिला)

| | | |
|---|---|---|
| १) अश्विनी सचिन जाधव | शिंदेसेना | ५१७५ |
| **२) मयुरी सुशांत जाधव** | **भाजप** | **७००२** |
| ३) भिंगारदिवे शितल मृणाल | उद्धवसेना | ४८८ |
| ४) सय्यद खुर्शीद सादीक | एमआयएम | २१६२ |
| ५) शेख वसीमा मतीन | अपक्ष | ४८ |
| ६) सय्यद शबाना शफी | अपक्ष | ३९ |
| ७) नोटा | | २४८ |

### प्रभाग क्र. १० ड (सर्वसाधारण)

| | | |
|---|---|---|
| १) सचिन तुकाराम जाधव | शिंदेसेना | १९८५ |
| **२) सागर राजू मुर्तडकर** | **भाजप** | **६८७५** |
| ३) शेख मुदस्सर जहांगिर | बहुजन समाज पक्ष | ५५३३ |
| ४) सीख दिलदारसिंग अजयसिंग | उद्धवसेना | ३६६ |
| ५) उत्कर्ष राजेंद्र गिते | अपक्ष | २९ |
| ६) प्रतापसिंह विजयसिंह परदेशी | अपक्ष | २१३ |
| ७) सय्यद आफताब शफी | अपक्ष | २५ |
| ८) नोटा | | १३५ |

### प्रभाग क्र. ११-अ (ना.मा.प्र.)

| | | |
|---|---|---|
| **१) उमेश खंडेराव कवडे** | **शिंदेसेना** | **५०१४** |
| २) विकास किशोर वाघ | भाजप | ४१०० |
| ३) विशाल संजय वालकर | उद्धवसेना | ७१४ |
| ४) सागर किरण शिंदे | राष्ट्रवादी अजित पवार | ३२० |
| ५) सुमित संतोष सहदेव | मनसे | १२०३ |
| ६) शेख मुश्ताक इब्राहिम | अपक्ष | १४४१ |
| ७) नोटा | | २०८ |

### प्रभाग क्र.११ ब (सर्वसाधारण महिला)

| | | |
|---|---|---|
| १) दिप्ती सुवेंद्र गांधी | भाजप | ४४०६ |
| **२) सुनिता संतोष गेनाप्पा** | **शिंदेसेना** | **४५०८** |
| ३) ताराबाई गणेश शिंदे | उद्धवसेना | १७६९ |
| ४) ताराबाई चंद्रकांत नवसुपे | शिवराष्ट्र सेना | ५८ |
| ५) चित्रा सुनील डापसे | अपक्ष | १५२ |
| ६) दंडी सुरेखा रवि | अपक्ष | ११३१ |
| ७) राजे सफिया नूर मोहमंद | अपक्ष | ३७८ |
| ८) वामन कोमल गणेश | अपक्ष | २५३ |
| ९) नोटा | | ३४४ |

### प्रभाग क्र. ११ क (सर्वसाधारण महिला)

| | | |
|---|---|---|
| **१) आशा किशोर डागवाले** | **राष्ट्रवादी (अजित पवार)** | **४२६८** |
| २) वासंती दत्तात्रय भंडारे | मनसे | ३५५ |
| ३) वैष्णवी सतीश मैड | शिंदेसेना | ३९९८ |
| ४) विमल शिवाजी सुसरे | उद्धवसेना | १११२ |
| ५) सोनाली अजय चितळे | अपक्ष | २८४४ |
| ६) आरती राहुल फुलडहाळे | अपक्ष | १२० |
| ७) नोटा | | ३०२ |

### प्रभाग क्र. ११ ड (सर्वसाधारण)

| | | |
|---|---|---|
| १) नरेंद्र सच्चिदानंद कुलकर्णी | शिंदेसेना | ४१७३ |
| **२) सुभाष सोपानराव लोंढे** | **भाजप** | **६७९१** |
| ३) इम्रान शफी अहमद शेख | अपक्ष | ९४९ |
| ४) मतीन नामजमहमंद शेख | अपक्ष | ५८७ |
| ५) नोटा | | ५०० |

### प्रभाग क्र.१२-अ नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला

| | | |
|---|---|---|
| १) रूपाली अंबादास गोटीपामूल | उद्धवसेना | १०८० |
| २) आरती महादेव रासकर | राष्ट्रवादी अजित पवार | ३४५९ |
| **३) मंगल सुनील लोखंडे** | **शिंदेसेना** | **५९५३** |
| ४) तहेसीन निसार शेख | समाजवादी पार्टी | ५८३ |
| ५) सुरैय्या मतीन कुरेशी | अपक्ष | २८७ |
| ६) नोटा | | १९६ |

### प्रभाग क्र.१२ ब- सर्वसाधारण महिला

| | | |
|---|---|---|
| **१) सुरेखा संभाजी कदम** | **शिंदेसेना** | **५८२१** |
| २) रूपाली लक्ष्मण जंजाळे | राष्ट्रवादी अजित पवार | २३७१ |
| ३) सय्यद आशाबी युनुस | उद्धवसेना | ३००९ |
| ४) नीतू नसीर बेग | अपक्ष | १४१ |
| ५) नोटा | | २११ |

### प्रभाग क्र.१२ क- सर्वसाधारण

| | | |
|---|---|---|
| १) अमोल सुरेश निस्ताने | भाजप | २८७० |
| **२) चंद्रशेखर मारुती बोराटे** | **शिंदेसेना** | **६३२८** |
| ३) अल्तमश सलीम शेख | राष्ट्रवादी शरद पवार | २०९९ |
| ४) हबीब सलीम खान | अपक्ष | ७४ |
| ६) नोटा | | १८१ |

### प्रभाग क्र.१२ ड सर्वसाधारण

| | | |
|---|---|---|
| **१) दत्तात्रय हरिभाऊ कावरे** | **शिंदेसेना** | **५५१८** |
| २) शुभ्रा पुष्कर तांबोळी | भाजप | २०३० |
| ३) शेख नजीर अहमद | राष्ट्रवादी शरद पवार | ३७९५ |
| ४) नोटा | | २११ |

### प्रभाग क्र. १३-अ (अनुसूचित जाती)

| | | |
|---|---|---|
| **१) सुरेश लक्ष्मण बनसोडे** | **राष्ट्रवादी अजित पवार** | **४७५९** |
| २) अभिजित मिलिंद भिंगारदिवे | शिंदेसेना | १७४२ |
| ३) रोहन रमेश शेलार | राष्ट्रवादी शरद पवार | ८३८ |
| ४) आशिष संतोष घरवाढवे | अपक्ष | ७९ |
| ५) उमेश बाबासाहेब साठे | अपक्ष | १७३ |
| ६) मनेष दशरथ साठे | अपक्ष | १८९७ |
| ७) नोटा | | २७२ |

### प्रभाग क्र.१३ ब (ना.म.प्र. महिला)

| | | |
|---|---|---|
| १) कल्याणी महेंद्र गाडळकर | राष्ट्रवादी शरद पवार | १४४७ |
| २) निर्मला कैलास गिरवले | शिंदेसेना | २३३२ |
| **३) सुजाता महेंद्र पडोळे** | **राष्ट्रवादी अजित पवार** | **५५०३** |
| ४) नोटा | | ४७८ |

### प्रभाग क्र. १३ क (सर्वसाधारण महिला)

| | | |
|---|---|---|
| १) अर्चना सुरेश गायकवाड | राष्ट्रवादी शरद पवार | २२१० |
| **२) अनिता विपुल शेटिया** | **राष्ट्रवादी अजित पवार** | **७०९६** |
| ३) नोटा | | ४५४ |

### प्रभाग क्र. १३ ड (सर्वसाधारण)

| | | |
|---|---|---|
| १) चंद्रकांत आनंद उजागरे | राष्ट्रवादी शरद पवार | १०३६ |
| **२) अविनाश हरिभाऊ घुले** | **राष्ट्रवादी अजित पवार** | **६६९४** |
| ३) अक्षय राजेंद्र शिंदे | काँग्रेस | १४६८ |
| ४) अमोल किसन सानप | अपक्ष | २१७ |
| ५) नोटा | | ३४५ |

### प्रभाग क्र. १४-अ (नागरिकांचा मागास प्रवर्ग)

**प्रकाश बाबुराव भागानगरे — राष्ट्रवादी (अ.प.) बिनविरोध**

### प्रभाग क्र.१४ ब (सर्वसाधारण महिला)

| | | |
|---|---|---|
| **१) सुनिता भगवान फुलसौंदर** | **राष्ट्रवादी (अजित पवार)** | **९८८६** |
| २) सुरेखा संतोष घरवाढवे | अपक्ष | ५३१ |
| ३) नोटा | | ३७६ |

### प्रभाग क्र. १४ क (सर्वसाधारण महिला)

| | | |
|---|---|---|
| **१) मीना संजय चोपडा** | **राष्ट्रवादी अजित पवार** | **६७७६** |
| २) शोभा परमेश्वर बडे | राष्ट्रवादी शरद पवार | ८३५ |
| ३) श्रुतिका हरिश भांबरे | शिंदेसेना | १६८० |
| ४) पूजा हर्षद वालेकर | अपक्ष | ६६८ |
| ५) वैष्णवी गौरव विधाते | अपक्ष | ५४७ |
| ६) नोटा | | २८८ |

### प्रभाग क्र. १४ ड (सर्वसाधारण)

| | | |
|---|---|---|
| १) दिलीप विठ्ठल झिंजुर्डे | शिंदेसेना | १८८८ |
| **२) गणेश पुंडलिक भोसले** | **राष्ट्रवादी (अजित पवार)** | **८४८८** |
| ३) संतोष डॅनियल घरवाढवे | अपक्ष | १७४ |
| ४) नोटा | | २४३ |

### प्रभाग क्र. १५-अ (अनुसूचित जाती महिला)

| | | |
|---|---|---|
| १) शीला विलास उबाळे | उद्धवसेना | ५०८ |
| **२) पौणिमा विजय गव्हाळे** | **राष्ट्रवादी अजित पवार** | **५०७६** |
| ३) अश्विनी विजय गायकवाड | राष्ट्रवादी शरद पवार | ५७० |
| ४) प्रियांका परशराम गायकवाड | शिंदेसेना | ४६७९ |
| ५) पार्वती लक्ष्मण घोडके | बसप | ११५ |
| ६) नोटा | | ३१७ |

### प्रभाग क्र.१५ ब (नागरिकांचा मागास प्रवर्ग)

| | | |
|---|---|---|
| **१) दत्तात्रय सोमनाथ गाडळकर** | **भाजप** | **६०७०** |
| २) सुवर्णा दत्ता जाधव | शिंदेसेना | ४८१५ |
| ३) गणेश बबन शिंदे | मनसे | १९४ |
| ४) नोटा | | १८७ |

### प्रभाग क्र. १५ क (सर्वसाधारण महिला)

| | | |
|---|---|---|
| **१) गीतांजली सुनील काळे** | **राष्ट्रवादी (अजित पवार)** | **५५३६** |
| २) विद्या दीपक खैरे | शिंदेसेना | ४६७९ |
| ३) सुरेखा विशाल खैरे | राष्ट्रवादी (शरद पवार) | ७७४ |
| ४) नोटा | | २८७ |

### प्रभाग क्र. १५ ड (सर्वसाधारण)

| | | |
|---|---|---|
| **१) सुजय अनिल मोहिते** | **भाजप** | **५२३९** |
| २) अनिल माधवराव शिंदे | शिंदेसेना | ५१२५ |
| ३) फैरोज अब्दुल करीम पठाण | वंचित बहुजन आघाडी | ४८१ |
| ४) अनिल अंबादास शिंदे | अपक्ष | २२० |
| ५) नोटा | | २०२ |

### प्रभाग क्र. १६-अ (अनुसूचित जाती महिला)

| | | |
|---|---|---|
| **१) सविता महेंद्र कांबळे** | **राष्ट्रवादी अजित पवार** | **६००९** |
| २) अश्विनी विशाल पाचरणे | उद्धवसेना | ७०० |
| ३) विमल दादू कांबळे | अपक्ष | ४४८५ |
| ४) मंगल रावसाहेब तेलोरे | अपक्ष | १५२८ |
| ५) नोटा | | ४३६ |

### प्रभाग क्र.१६ ब (नागरिकांचा मागास प्रवर्ग)

| | | |
|---|---|---|
| **१) वर्षा सुजित काकडे** | **राष्ट्रवादी अजित पवार** | **४९३३** |
| २) सुनीता संजय कोतकर | शिंदेसेना | ३००२ |
| ३) सविता अशोक कराळे | अपक्ष | ४७९५ |
| ४) वंदना संजय गाडीलकर | अपक्ष | १९५ |
| ५) नोटा | | २३५ |

### प्रभाग क्र. १६ क (सर्वसाधारण)

| | | |
|---|---|---|
| **१) विजय मोहनराव पठारे** | **भाजप** | **४७८०** |
| २) विशाल बबनराव पठारे | काँग्रेस | १८५ |
| ३) प्रतीक अरविंद बारसे | उद्धवसेना | २९८ |
| ४) ओंकार दिलीप सातपुते | शिंदेसेना | ३६४० |
| ५) सागर अंजाबापू सातपुते | अपक्ष | ४१४५ |
| ६) नोटा | | ११४ |

### प्रभाग क्र. १६ ड (सर्वसाधारण)

| | | |
|---|---|---|
| १) श्रीकांत नाथाजी चेमटे | उद्धवसेना | ३९७ |
| २) गणेश महादेव भोसले | काँग्रेस | २६३ |
| **३) ज्ञानेश्वर शिवाजी येवले** | **भाजप** | **६०८९** |
| ४) हर्षवर्धन महादेव कोतकर | अपक्ष | १५८५ |
| ५) धनाजी दत्तात्रय गायकवाड | अपक्ष | १३६ |
| ६) भूषण अशोक गुंड | अपक्ष | ४३६६ |
| ७) मतीन सादिक सय्यद | अपक्ष | १८२ |
| ८) नोटा | | १३७ |

### प्रभाग क्र. १७-अ (अनुसूचित जाती)

| | | |
|---|---|---|
| १) सिद्धांत संजय कांबळे | उद्धवसेना | ५५२ |
| २) राहुल गोरख जाधव | मनसे | २४८ |
| ३) वैभव सुनील पाचारणे | आम आदमी पार्टी | १४१ |
| **४) मयूर कन्हैयालाल बांगरे** | **राष्ट्रवादी अजित पवार** | **६४२६** |
| ५) अण्णासाहेब मनोहर शिंदे | शिंदेसेना | १६८६ |
| ६) आकाश रघुनाथ शिंदे | राष्ट्रवादी शरद पवार | ४३२ |
| ७) भरत सुभाष कांबळे | अपक्ष | १०७८ |
| ८) नोटा | | २३० |

### प्रभाग क्र.१७ ब (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला)

| | | |
|---|---|---|
| १) अलका बाळकृष्ण भाले | उद्धवसेना | ६६८ |
| **२) अश्विनी सुमित लोंढे** | **राष्ट्रवादी अजित पवार** | **५१५५** |
| ३) गौरी गणेश ननावरे | अपक्ष | ७७९ |
| ४) धनश्री योगेश सरोदे | अपक्ष | ३९३९ |
| ५) नोटा | | २५२ |

### प्रभाग क्र. १७ क (सर्वसाधारण महिला)

| | | |
|---|---|---|
| १) मनीषा सोपान कारखिले | शिंदेसेना | ४५३६ |
| **२) कमल जालिंदर कोतकर** | **भाजप** | **५३३६** |
| ३) आशा किशोर जाधव | राष्ट्रवादी शरद पवार | २९७ |
| ४) विजया अरुण कोतकर | अपक्ष | ४६० |
| ५) नोटा | | १६३ |

### प्रभाग क्र. १७ ड (सर्वसाधारण)

| | | |
|---|---|---|
| **१) मनोज शंकर कोतकर** | **भाजप** | **६६७५** |
| २) अंबरनाथ तुकाराम भालसिंग | मनसे | २०१ |
| ३) हर्षवर्धन महादेव कोतकर | अपक्ष | ८८२ |
| ४) दत्तात्रय पंडितराव खैरे | अपक्ष | २७३७ |
| ५) मिलिंद शिवाजी भालसिंग | अपक्ष | १४९ |
| ६) नोटा | | १४९ |

